ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

ऑगस्ट २०१२ • मूल्य १० ₹



मृणालताई गोरे

लाखो लोकांचं 'विश्वासघर'

– प्रमोद निगुडकर



'लॉक ग्रिफिन' पुस्तकाच्या
पुणे येथील प्रकाशनसमयी
**राहुल सोलापूरकर**
**अरुण साधू**
**धनंजय गांगल**
लेखक **वसंत वसंत लिमये**
पद्मश्री **सतीश आळेकर**
**आनंद लिमये** आणि
**नीलेश जाधव**




'आठवणीतील पाऊले'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी
**गिरीश रेगे**
**डॉ. बापुसाहेब रेगे** (लेखक)
**डॉ. वसुधा कामत**
(कुलगुरू, एस.एन.डी.टी.
महिला विद्यापीठ)
**उषा मेहता** (ग्रंथाली विश्वस्त)
आणि
**नीलेश निमकर** (शिक्षणतज्ज्ञ)

ग्रंथाली

प्रत्येक अर्जुनाला कृष्ण लागतो, तसा प्रत्येक कृष्णालाही एक अर्जुन लागतो...




आंतरराष्ट्रीय रहस्याचा सनसनाटी
भेद करणारी कादंबरी

## ब्लॅक ग्रिफिन

वसंत वसंत लिमये

मूल्य ५०० रु. • सवलतीत ३०० रुपये

आउशवित्झ छळछावणी

## नाझी नरसंहार

कुमार नवाथे

नव्या स्वरूपातील तिसरी आवृत्ती

मन गोठावून टाकणारी नाझी क्रौर्याची
भयानकता प्रकट करणारे, वेगळे
संदर्भमूल्य असलेले पुस्तक

मूल्य १५० रुपये
सवलतीत १०० रुपये



**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**ऑगस्ट २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक आठवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

'देव भावाचा भुकेला' आणि 'प्रत्येक प्राणिमात्रात ईश्वराचा अंश आहे' या मानवनिर्मित उक्तींचा संयुक्त वापर मानवानंच कायम केला आहे. म्हणूनच प्रत्येक माणसाचा 'भाव' ठरलेला असतो. त्याला तो लागतोही. हा भाव बऱ्याचदा पैशांत असतो व त्याची पूर्तता म्हणजे 'भ्रष्टाचार' हे आपणच ठरवतो. देणाऱ्याने देत जावे, तसा भ्रष्टाचार घेतला व दिला जातो. प्रसिद्धी आणि स्तुती ही 'भावा'ची आणखी दोन लक्षणं. देण्या–घेण्याच्या परस्पर सामंजस्यातून आपली नैया पार लावणारी.

या 'भ्रष्टाचारा'विरुद्ध लढा उभा केल्याचं गडद चित्र आता राजकीय मार्गाला लागल्यानं धुसर होऊन गडप होतं का ते कळेलच. भ्रष्टाचाराविरुद्ध हे काही पहिलं आंदोलन नव्हतं. तरी अण्णा वाक्यम् प्रमाणम् मानून जनता त्यामागे गेली. मात्र आता वेगळंच 'मंतर' अण्णा म्हणू लागले आणि त्यांच्या टीमची तंतरली.

मृणालताई गोरेंच्या निधनानं भ्रष्टाचारविरोधी खऱ्या लढ्याची आठवण या काळाला करून दिली आहे. 'पाणीवाली बाई' म्हणून ओळख असलेल्या मृणालताईंनी मुख्यमंत्र्यांपासून साठेबाजांपर्यंत अनेकांना पाणी पाजलं. डॉक्टरकीचा अभ्यास सोडून समाजाची नाडी त्यांनी तपासली, त्यावर उपाय योजला. ही रणरागिणी प्रत्यक्षात माणूसपण जपणारी स्त्री कशी होती हे त्यांच्यासोबत अनेक वर्षं असलेल्या प्रमोद निगुडकर यांनी या अंकात लिहिलंय.

या वर्षी पावसानं तोंडचं पाणी पळवलंय. दुष्काळसदृश स्थिती आहे. देशाचे कृषिमंत्री अवैध, अनावश्यक 'उपसा' करणाऱ्यांवर कडक उपाय योजणार आहेत. मात्र खरोखरच समाजाचा विचार करणारे, रचनात्मक काम करणारे कार्यकर्ते सर्वत्र आहेत. त्यात काही पाणी साठवणुकीचे नवे पर्याय सांगतात. अशाच उल्हास परांजपे या अभियंत्यानं पाणी साठवण्याच्या टाक्यांचा प्रसार चालवलाय. त्याबाबत प्रशांत मोरे लिहितायत. अपर्णा पाटील यांनी ऑलिंपिकमध्ये सहभागी, पण देश नसलेल्या खेळाडूंची कहाणी सांगितली आहे. डॉ. माधवी मेहेंदळे यांनी ठिकठिकाणच्या आर्ट गॅलरी पाहण्याच्या निमित्तानं तिथल्या मानवी जीवनाचं दर्शन झालं ते मांडलंय. चित्रपटशताब्दी वर्षानिमित्त अरुण पुराणिक सुलोचना चव्हाण यांच्याबद्दल लिहीत आहेत.

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'च्या दोन लेखांतून दोन व्यक्तित्व उलगडतात. अशा विधायक कामांची नोंद 'रुची' घेत राहील.

**– कार्यकारी संपादक**

# लाखो लोकांचं ‘विश्वासघर’

## प्रमोद निगुडकर

‘‘तुम्हाला शंभरी गाठताना पाहायचं आहे आम्हाला, आता फक्त सोळा वर्षं आहेत.’’ कोकणातून मृणालताईंना वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला आलेल्या कमलताई परुळेकरांनी ताईंना सांगितलं आणि ताई जोरात हसल्या. म्हणाल्या, ‘धडधाकट असेन, आरोग्य चांगलं राहणार असेल तर ठीक. नाहीतर कशाला शंभर वर्षं?’

जगण्यावर नितांत प्रेम करणाऱ्या, आयुष्यातील असंख्य प्रसंगांना खंबीरपणे सामोरे जात- मग तो प्रसंग सामाजिक जीवनातील असो, कुटुंबातील असो वा स्वत:च्या आरोग्यासंदर्भातील असो- मृणालताई कधीही खचलेल्या दिसल्या नाहीत. अगदी त्यांच्या पायाचं ऑपरेशन करून पाय काढल्याचं त्यांना कळलं तेव्हाही त्यांच्या चेहऱ्यावर तसं काही भासलं नाही.

आणीबाणीनंतरच्या निवडणुकीचा प्रचार करायला त्या मालवणीला आल्या होत्या. आम्ही राष्ट्रसेवादलाच्या सैनिकांनी विवेक पंडितच्या नेतृत्वाखाली त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम आखला होता. आम्ही त्यावेळी दहा दहा पैसे गोळा करून त्यांच्या निवडणुकीसाठी निधी गोळा केला होता. मृणालताई त्यावेळीही आमच्यासाठी खूप मोठ्या नेत्या होत्या. शाखानायक म्हणून मला त्यांच्या जरा जवळ जाता आलं होतं. ताईंचं रुबाबदार आणि आक्रमक वाटावं असं व्यक्तिमत्त्व, पण समोरच्याला आपलंसं करणारं, आश्वासक वाटणारं त्यावेळचं त्यांचं हास्य मी जेव्हा केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या कामात आलो तेव्हाही, म्हणजे जवळजवळ तीन दशकांनंतरही कायम होतं.

मला गेल्या आठ-दहा वर्षांत ताईंचा विशेष सहवास लाभला. अलीकडे त्या जरा लवकर थकत. जास्त वेळ त्यांना बसता येत नसे. अनेक वेळा विस्मरणही होत असे. पण तरीही कार्यकर्ते आजूबाजूला असले की त्यांच्यात एक उत्साह यायचा. त्या घरात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची नीट विचारपूस तर करायच्या, आग्रह करून चहा प्यायला लावायच्या. सुवर्णा जी गेली दोन वर्षं ताईंची सेवा करत असे तिला काही खायला आणून द्यायला सांगत असत. एखाद्या विषयावर चर्चा सुरू झाली की अगदी त्याच तडफेनं आपली बाजू मांडत असत. आपल्या मूल्यांवर व विचारांवर उत्कट विश्वास असणाऱ्या काही मोजक्या लोकनेत्यांपैकी ताई एक होत्या. होत्या असं लिहिताना गळ्यात आवंढा आल्याशिवाय राहत नाही.

ताई इतक्या लगेच आपल्यात नसतील असं कोणालाच वाटलं नव्हतं. म्हणूनच सगळ्यांना हळहळ लागून राहिली आहे. त्यांच्या आठवणी काढताना सर्व लहानथोरांचे डोळे ओले होतात. ग्यानसिंग टॅक्सीवाला जो ताईंचा अनेक दशकं कार्यकर्ता होता, तो म्हणतो त्याप्रमाणे ‘‘भरा नही है भावोंसे बहती जिसमे रसधार नही. वह मानव नही पत्थर है जिसे ताईसे प्यार नही.’’

लाटणं, हंडा, थाळी आणि बायकांची वज्रमूठ यांना हत्यार करणाऱ्या हा लढवय्या बाईतलं माणूसपण काही अजबच होतं. मुख्यमंत्र्याचा थरपाक उडवणारी ही बाई सर्व-सामान्यांशी आपलं असणारं नातं अत्यंत जाणीवपूर्वक जपायची. गोरेगावातील स्क्वॉर्टर कॉलनीतील महंमदभाई यांच्याशी असलेलं त्याचं नातं, त्यांच्या कुटुंबाची वेळोवेळी केलेली चौकशी, आपल्या घरी काम करणाऱ्या लीलाबाईंच्या घरी जाऊन कोणताही संकोच न करता जेवणं, राष्ट्रसेवादलाच्या सुधीर देसाईंच्या घरी त्यांच्या ५०व्या वाढदिवसाच्या निमित्तानं असलेल्या कार्यक्रमात जेवायला बसायच्या आधी आपल्या ड्रायव्हरला जेवायला बसायला सांगणं, असे अनेक प्रसंग सांगता येतील.

श्रीकांत जवळजवळ दहा वर्षं ताईंची गाडी चालवत असे. त्याचं आणि ताईंचं नातं काही वेगळंच होतं. ताईंना कोणता चहा लागतो आणि कोठे कांदाभजी खायला त्यांना आवडतं इथपासून घरामध्ये कोठली वस्तू कोठे आहे इथपर्यंत ताईंपेक्षा जास्त श्रीकांतलाच माहीत असे. ताईंना काय पाहिजे हे त्याला न सांगताच कळे आणि ताईसुद्धा श्रीकांत जवळपास असला की निर्धोक असत. श्रीकांतच्या मते ताई म्हणजे खूप धीराच्या, निर्भीड आणि तितक्याच प्रेमळ.

ताईंच्या पायाच्या ऑपरेशननंतर त्यांच्या हालचाली जरा मंदावल्या. श्रीकांतचं त्यांच्याकडे बारीक लक्ष असे. त्याला त्या कधी राजकारणी नेत्या वाटल्याच नाहीत. एका मोठ्या कुटुंबाच्या प्रमुख वाटल्या. सुखदु:खाच्या काळात आधार देणाऱ्या, बायकोच्या ऑपरेशनच्या वेळी पाठीशी उभ्या राहणाऱ्या, अडल्यानडलेल्याला मनापासून मदत करणाऱ्या ताई जेव्हा त्याच्या घरी येऊन गेल्या तेव्हा त्याला भरून पावलं



होतं. ताईंनी कधी कोणताही भेदभाव केला नाही, कोणाही कर्मचाऱ्यावर कधी रागावल्या नाहीत. काही चूक झालीच तर ती दाखवून देत, पण त्याचा उल्लेख परत कधी करत नसत. ताई नाहीत हे श्रीकांतला खरंच वाटत नाही. तसं ते अनेक कार्यकर्त्यांना आणि त्यांच्याबरोबर राहिलेल्यांना वाटतंय.

ज्योती केळकर या 'भूमिसेना' आणि नंतर 'स्वाधार'चं काम पुढे नेणाऱ्या कार्यकर्तीच्या आठवणीही याचं प्रत्यंतर देतात. ज्योतीच्या आठवणीतील ताई म्हणजे समाजाचं नेतेपण निभावताना माणूसपण जपणारं व्यक्तिमत्त्व.

''स्वत: चांगल्या जेवणाखाण्याचा आनंद लुटणं हा ताईंचा स्थायीभाव आणि दुसऱ्यांना आपल्या हातचं खिलवणंही. अळूची भाजी ही ताईंची खासियत. एकदा कधीतरी त्यांच्याकडे जेवताना त्यांनी केलेली अळूची भाजी खाण्यात आली. खरंच खूप छान केली होती. मी आणि अंगणवाडी कर्मचारीसभेची सेक्रेटरी कमल परुळेकरनं मनापासून त्याचा आस्वाद घेतला. पुढे दोन-तीन वर्षांनी आम्ही दोघी एकत्र एका कामानिमित्त त्यांच्याकडे वस्तीला होतो. आपल्या हातची अळूची भाजी आम्हा दोघींना आवडली होती हे लक्षात ठेवून, त्यांच्याकडील गीताला अळू आणायला लावून, त्यांनी आमच्या दोघींसाठी त्यादिवशी अळूची भाजी बनवून आम्हाला खिलवली होती. त्यांच्या हाताची चव अजूनही जिभेवर रेंगाळत आहे. त्यांच्यासोबत काम करणाऱ्या त्यांच्यापेक्षा वयानं, कामानं लहान असलेल्या आमच्या दोघींची आवड त्यांनी लक्षात ठेवावी, आवर्जून भाजी करावी हे त्यांच्यातलं माणूसपण एक वेगळंच नातं सांगून गेलं.

''मृणालताईं स्वत: लहानग्या अंजूसाठी फ्रॉक शिवत असत. त्यांनीच तसं सांगितलं होतं. आपल्या व्यस्त कामातून वेळ काढत त्यांनी आपल्यातली कला जोपासली होती. कपड्यांच्या दुकानासमोर उभं राहायचं, नवीन फॅशन बघायची आणि अंजूला तसा फ्रॉक शिवायचा, असं त्या सांगत असत.

''सौजन्य आणि विनम्रता या गुणांबरोबर योग्यवेळी परखडपणा दाखवून आपला व्हेटो वापरणंही त्यांनी केलेलं आम्ही अनुभवलं आहे. ताईंचं व्यक्तिमत्त्व उत्तुंग खरंच. अगदी कोणीही अनोळखी व्यक्तीसुद्धा ताईंशी सहजगत्या संवाद साधू शकत होती. आपल्या व्यक्तिमत्त्वाचं दडपण त्यांनी सर्वसामान्य लोकांना येऊ दिलं नाही.''

ज्योतीकडे भरभरून सांगण्यासारखं खूप आहे. तसं ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील महिलांकडे आणि कार्यकर्त्यांकडे असणार आहे.

केशव गोरे स्मारक ट्रस्टमध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाला ताई हजर राहत. आम्ही त्यांची विशेष काळजी घेत असू. प्रत्येक कार्यक्रमाच्यावेळी येणाऱ्या पाहुण्यांची काय व्यवस्था केली आहे याकडे ताईंचे लक्ष असे. न चुकता ताई मला दोन प्रश्न विचारत. एक, पाहुण्यांची बसण्याची व्यवस्था कोठे केली आहे आणि दुसरा, कार्यक्रम संपल्यावर पाहुण्यांना पोचवण्याची व्यवस्था काय आहे?

य.दि.फडके प्रगत संशोधन केंद्राच्या आमच्या खोलीमध्ये बऱ्याचदा पाहुण्यांच्या बसण्याची व्यवस्था असे. ताईंची त्या खोलीतील बसण्याची जागा ठरलेली होती. ताई येण्यापूर्वी पाहुणे आत असले की ताईंना आपल्याला उशीर झाला म्हणून अवघडल्यासारखं होई. विनम्रतेनं सर्वांची माफी मागून मग त्या चर्चेत सहभागी होत.

समाजकारण, राजकारण करताना अभ्यास करावा, प्रश्न समजून घ्यावेत, विविध पैलूंचा विचार करावा आणि मग भूमिका ठरवावी यावर ताईंचा भर असे. म्हणून संवाद, चर्चा आणि मग निर्णय अशा त्रिसूत्रीवर ताईंनी आपलं काम उभं केलेलं दिसतं. काही वेळेला चर्चा, संवाद वादापर्यंत गेले. काही मतांतर झाली तरीही संवाद सुरूच ठेवा असं ताई सांगत.

बाबुराव ऊर्फ प.बा. सामंत यांच्यासारख्या अत्यंत जवळच्या सहकारी आणि सल्लागाराबरोबरही अनेकदा अशा प्रकारच्या चर्चा झालेल्या अनेक कार्यकर्त्यांनी अनुभवलेल्या आहेत. मनात असलेला निःस्पृह भाव आणि निःस्वार्थपणा यामुळेच अशा प्रकारचा संवाद ताईंना शक्य होत असे.

राजकारणातील पक्षीय फाटाफुटीनंतर सोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर झालेला वाद आणि त्यांना ताईंनी दिलेली; तर काहींची ऐकून घेतलेली उत्तरं यांचं स्मरण आजही काही जुने कार्यकर्ते करतात.

एस.एम.सारख्या नेत्यांसोबतही ताईंची काही मतांतरं झाली पण त्यांची तब्येत

बरी नाही असं कळल्याबरोबर ताबडतोब त्यांना भेटायला जायच्या. मतभेद कधी ताईंच्या आड आले नाही आणि ताईंना कमीपणाचे वाटले नाही, किंबहुना त्यांनी ते आपुलकीच्या भावनेनंच केलं. समाजकारण, राजकारण आणि वैयक्तिक जीवन यातील रेषा ताईंच्या बाबतीत खूपच धूसर होत्या. किंबहुना ते वेगळं नव्हतंच. बाबुराव सामंत, वसंत फळणीकर यांसारखे सहकारी सल्लागार म्हणून त्यांच्या कुटुंबातील एक व्यक्ती झाले आणि मधु आडेलकर, कृष्णकांत नेवरेकर, श्रीनिवास प्रभू ही ट्रस्टची विश्वस्त मंडळी ताईंची आपल्या ताईप्रमाणे काळजी घेताना मी अनेक वेळा पाहिलेलं आहे.

कोणत्याही लोकनेत्याचा असतो तसा ताईंचाही कार्यकर्ता म्हणजे श्वास होता. त्यांनी स्वाभाविकपणे कार्यकर्ते जोडले. ताई स्वत: हाडाच्या कार्यकर्त्या. त्यांना कार्यकर्त्याच व्हायचं होतं. डॉक्टरीचं शिक्षण सोडून त्यांनी समाजसेवक म्हणून लोकांसाठी जगण्याचं ठरवलं आणि मोठा लोकसंग्रह केला. मग त्या नागपुरात अंगणवाडी सेविकांसोबत काम करणाऱ्या लीलाताई चितळे असोत किंवा कोकणातील कमलताई असोत. ताईंमधल्या निष्कलंक 'व्यक्ती'चं गारुड सर्व प्रकारचं पक्षीय व इतर कुंपण मोडून टाकत असे. म्हणूनच वैचारिक पक्षीय बांधीलकी वेगळी असूनही अनेक लोकांबरोबर ममत्व सांगणं ताईंना शक्य झालं. डाव्या चळवळीतील ज्योती म्हापसेकर, शारदा साठेंपासून उजवीकडच्या जयवंतीबेन मेहतांसारख्या कार्यकर्त्यांना ताईंबद्दल नितांत आदर होता. राष्ट्रसेवादलाला पश्चिम उपनगर जिल्ह्यात बैठक घ्यायला स्वत:ची कचेरी असावी म्हणून टोपीवाला बंगल्यामध्ये जागा देऊन, संघटना बांधणीसाठी त्यांनी वेळोवेळी मदत तर केलीच, शिवाय कार्यकर्त्यांना जोडून घेताना त्यांच्या अडीअडचणींकडे, गजरांकडेही ताईंचे लक्ष असायचं. अगदी लग्नासाठी स्थळ शोधण्यापर्यंत.

युनुसचा अनुभव या बाबतीत अगदी बोलका आहे. नगर जिल्ह्यातल्या राष्ट्रसेवादलाशी संबंधित कुटुंबातील युनिस शेखची आणि ताईंची पहिली भेट १९८५मध्ये झाली आणि तेव्हापासून शेवटपर्यंत युनुस शेख ताईंच्या सहवासात राहिला. 'मला ताईंना भेटल्याशिवाय करमायचंच नाही, आज माझी आई गेल्याचं दु:ख मला होतं', असं म्हणत युनुसनं ताईंनी त्याला नोकरी मिळाल्यापासून पुढच्या सर्व आयुष्यासाठी मदत कशी केली याच्या आठवणी काढल्या. मुलांना मराठी शाळेतच घातलं पाहिजे, असं ताईंनी निक्षून सांगितलं होतं त्याला. 'एकदा, आमदारांना बस तिकिटासाठी मिळणारं एक हजार रुपयाचं ताईंचं पुस्तक माझ्याकडून हरवलं गेलं. याबद्दल एक चकार शब्दही कधी ताईंनी विचारला नाही. उलट नंतर ताईंचे स्वीय सचिव असणाऱ्या नाखरेकरांनी मला सांगितलं, ताईंनी पैसे भरलेत बरं का?' युनुस सांगत होता.

हेमा पेडणेकर असाच आपला १९८८च्या झोपडी परिषदेचा अनुभव सांगते. १९८८ सालात झोपडी परिषदेचं आयोजन केलं गेलं होतं. 'राहील त्याचं घर' अशी घोषणा होती. ताईंनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत सर्व वस्त्यांवर जाऊन माहोल तयार केला होता. कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरातून पाच रुपये वर्गणी गोळा करावी असं ठरवण्यात आलं. हेमानंही वर्गणी गोळा करायला सुरुवात केली. कोणाच्या तरी सल्ल्यावरून तिनं पाच रुपयांसोबत एक रुपया अधिकचा गोळा केला, म्हणजे प्रत्येक घरातून सहा रुपये गोळा केले. पाच रुपये परिषदेसाठी व एक रुपया कार्यकर्त्यासाठी म्हणजे स्वत:साठी. पैसे गोळा झाले तसे हेमानं सर्व पैसे टोपीवाला बंगल्यात नेऊन जमा केले. पैसे जमा करताना ताईंना सांगितलं की मी पाच रुपये परिषदेसाठी व एक रुपया कार्यकर्त्याला म्हणून घेतला आहे. ताई त्यावेळी काही बोलल्या नाहीत. त्यांनी फक्त बघितलं. हेमाला काहीतरी गडबड झाल्याचं जाणवलं. मग ताईंनी तिला सांगितलं, 'अगं, तुला बरोबरीचं स्थान दिलं आणि त्याची किंमत तू एक रुपयात केलीस?' ताई इतकंच बोलल्या. हेमाच्या ते जिव्हारी लागलं. प्रत्येक घराघरात जाऊन तिनं तो रुपया परत केला आणि ताईंची ती पाईक झाली. नंतरच्या दोन कोकण दौऱ्यांमध्ये ताईंबरोबर गेली, अधूनमधून दुभाषाचं काम करायला. मालवणीत कोणी काही बोललं आणि ताईंना समजलं नाही तर ते समजावून द्यायला. ताईंचा विश्वास कमवला तिनं.

''शेगावहून महिला दिनाचा कार्यक्रम संपवून निघालेल्या पाचशे महिलांसोबत मृणालताईसुद्धा होत्या. गाडीत चढताना काही महिलांसोबत ताई गाडीत शिरल्या आणि काही महिला खालीच राहिल्या. दुसरी गाडी सकाळशिवाय नव्हती. खाली राहिलेल्या महिलांसोबत सकाळची गाडी पकडून मी मुंबईला आले. दादरला उतरून पाहते तर ताई इतर महिलांसोबत मागून येणाऱ्या महिलांसाठी रात्रभर वाट पाहात राहिल्या होत्या. कार्यकर्ते ताईंसाठी किती महत्त्वाचे होते. मला बघितल्यावर म्हणाल्या, 'या सगळ्यांना मी सांगितलं होतं – हेमा आहेना त्यांच्यासोबत मग ती सगळ्यांना सांभाळून आणेल.' ताईंचे ते शब्द अजूनही मला आठवतात आणि मी त्यांचा विश्वास मिळवू शकले याचं बरं वाटतं.'' हेमाला मिळालेलं समाधान अनेक कार्यकर्त्यांनी अनुभवलं आहे.

महाराष्ट्रभर पसरलेल्या कार्यकर्त्यांनी ज्यांना ताईपण बहाल केलं, छोट्यामोठ्या आंदोलनांना आणि कुटुंबातील अडी-अडचणींनासुद्धा ज्यांचा आधार वाटत आला, त्यांच्या नसण्यानं पोरकं वाटणं स्वाभाविक आहे. न भरून काढता येणारी ही पोकळी आहे. लाखो लोकांचं 'विश्वासघर' असणाऱ्या ताईंना सलाम.

**– प्रमोद निगुडकर**
२०२, माध्यम को.ऑप.सोसायटी,
१३९, महात्मा गांधी रोड,
गोरेगाव (प.), मुंबई – ४०० ०६२.
भ्रमणध्वनी क्र. ९८६०२८७९६६
pnigudkar@gmail.com

# देश नसलेला अॅथलिट

## अपर्णा पाटील

ऑलिम्पिक म्हणजे एखाद्या खेळाडूसाठी काय असतं, तर जगातल्या सर्व खेळाडूंनी एकत्र येण्याचा, आपआपल्या देशाचं प्रतिनिधित्व करण्याचा आणि खेळण्याचा एक सोहळा. त्यात जगातले जे कोणी सर्वोत्तम असतात, ते ठरतात विजेते. दर चार वर्षांनी खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेत जो चमकतो, त्याचं जीवन बनतं एक इतिहास. इथे तर गोर मरिअल या स्पर्धेत उतरण्याआधीच इतिहासातलं एक सोनेरी पान बनला आहे.

मिनिपोलिसमधली ट्विन सिटी मॅरेथॉन स्पर्धा. ऑलिम्पिकसाठीच्या पात्रता फेरीसाठी त्या स्पर्धेचं, २६.२ मैलाचं अंतर धावताना त्यानं नोंदवलेली वेळ होती २ तास, १४ मिनिटं, ३२ सेकंद. त्यामुळे लंडन ऑलिम्पिक प्रवेश निश्चिती तर झाली होती. तोच ठरला एक नवा स्टार्ट, मरिअल नावाच्या खेळाडूचा.

अनेक अडीअडचणींवर मात करत देशासाठी ऑलिम्पिकचं स्वप्न पाहणारे, पदकाची आशा धरत देशाला सन्मान मिळवून देण्याची अपेक्षा करणारे खेळाडू खूप आहेत, पण मरिअलसारखा आणखी कोणी असेल, असं सांगता येत नाही. काय आहे मरिअलचं वेगळेपण? कोण्या एका पत्रकारानं त्याच्या आयुष्याविषयीची कहाणी लिहिताना 'वर्दी ऑफ अ मूव्ही', असा त्याचा उल्लेख केलाय. ऑलिम्पिकच्या ट्रॅकवर धावण्यापूर्वीच मरिअल हिरो का ठरला, ते समजलं तर जगातल्या प्रत्येकाला त्याचा अभिमान वाटेल.

ऑलिम्पिकमध्ये सगळ्यात जास्त कोणती स्पर्धा पाहिली जात असेल तर ती शंभर मीटर धावण्याची. जगाची जेवढी लोकसंख्या आहे, तिच्या निम्मे लोक ही स्पर्धा पाहतात असं म्हटलं जातं. कदाचित त्याहूनही जास्त लोक यंदाचं ऑलिम्पिक पाहतील. त्याचं एक छोटेसं कारण मरिअल हे असेल.

लाखो खेळाडू ऑलिम्पिकमध्ये प्रवेश करण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी हजारो गोष्टींचा त्याग करायला तयार होतात. पण मरिअल तर ते स्वप्नच त्यागायला निघाला होता. मरिअलचं या स्पर्धेच्या पात्रताफेरीत विजयी होणं, ही फार मोठी गोष्ट नव्हती, कठीण होतं ते त्याच्या इच्छेला आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक कमिटीनं मान्य करणं. त्याची इच्छा होती ती, या स्पर्धेत फक्त आपल्या देशासाठी धावण्याची.

कोणाला वाटेल त्यात काय मोठंसं, ऑलिम्पिक मुळात प्रत्येक खेळाडू आपल्या देशासाठीच खेळतो. पण मरिअलच्या इच्छेमुळेच त्याचं ऑलिम्पिकला जाणं धोक्यात आलं होतं. कारण आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक कमिटीच्या यादीवर त्याचा देश नव्हता. ऑलिम्पिक समितीनं जर मान्यता दिली नसती तर तो आपल्या आयुष्यातल्या या महत्त्वाकांक्षी स्वप्नाचं बलिदान द्यायला निघाला होता. ऑलिम्पिक स्पर्धेत धावणं अनिश्चित झालं होतं. जगाला त्याची कहाणी एका मुलाखतीतून समजली आणि त्याचीच दखल घेत कोणत्याही देशाच्या नाही तर ऑलिम्पिकचं बोधचिन्ह असलेल्या झेंड्याखाली धावण्यासाठी त्याला परवानगी मिळाली. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीनं त्याला या स्पर्धेत सहभागी होण्याची मान्यता दिली तो दिवस होता, २० जुलै. ऑलिम्पिक स्पर्धेचा उद्‌घाटनसोहळा अगदी काही दिवसांवर ठेपलेला असताना, ऑलिम्पिकसाठी लंडनला जाण्याचा पासपोर्ट मिळवणं आणि जाताना आपल्या देशाचा राष्ट्रीय ध्वज नेणं ही गोष्ट फार कष्टाची असायला नको. एखाद्याला पासपोर्ट मिळवण्यासाठी कटकटींचा सामना करावा लागू शकतो, पण आपल्या देशाचा ध्वज नेता न येणं, हे जरा बुचकाळ्यात टाकणारं आहे ना? तरी मरिअल ऑलिम्पिक स्पर्धेत उतरू शकणार, हे निश्चित झालं. त्यामागची कहाणी मोठी रोमहर्षक आहे, आणि त्यासाठी मरिअलनं केलेला संघर्ष साधासुधा नाही.

अॅथलिट ब्रॅड पूरे आणि मरिअल यांची भेट झाली होती ती, गेल्या वर्षी झालेल्या ट्विन सिटी मॅरेथॉनच्यावेळी. दोघांची दोस्ती झाली. पूरे ऑलिम्पिकमध्ये उतरण्यास पात्र ठरला नाही पण सच्चा मित्र म्हणून तो कसोटीला पुरेपूर उतरला. आपल्या दोस्ताची कहाणी ऐकली तेव्हापासून देश नसलेल्या या खेळाडूला ऑलिम्पिकमध्ये संधी मिळावी, यासाठी तो झटत होता. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक कमिटीकडे पाठपुरावा करत होता. नुकताच स्वतंत्र झालेला दक्षिण सुदान हा मरिअलचा देश होता. ज्या देशाचा जन्म नुकताच झालाय, अशा देशाचं मरिअलला प्रतिनिधित्व करायचं होतं. पृथ्वीतलावर जो

देश नुकताच जन्मलाय, अशा देशात राष्ट्रीय ऑलिम्पिक समिती स्थापन व्हायला काही अवकाश लागणारच. मग मरिअलला ऑलिम्पिकमध्ये सहभागी तरी कसं होता येणार? मात्र या प्रश्नावर उत्तर शोधायला लावलं ते पूरे आणि काही पत्रकारांनी.

खरं तर पत्रकार मंडळी काही विषयांपासून जरा लांब राहतात. मरिअलच्या कहाणीला राजकीय, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय धोरणं अशा गुंत्यांनी वादग्रस्त बनवलं होत. ऑलिम्पिकमध्ये संधी मिळायला त्याचं ट्रॅक रेकॉर्ड पुरेसं होतं, पण त्याला आपल्या देशाचा नागरिक म्हणून या स्पर्धेत सहभागी व्हायचं होतं. मात्र यात अमेरिकेची धोरणं, ऑलिम्पिक समितीचे नियम असा तिढा होता. त्यामुळे हे कसं काय शक्य होणार, हा मोठाच प्रश्न होता. पण पूरेचं झपाटलेपण मरिअलला दंतकथा बनवणारं ठरलं.

गोर मरिअल हा सुदानमधल्या सिव्हिल वॉरच्या काळात अमेरिकेत रेफ्युजी म्हणून आश्रयाला गेला होता. ज्याची कहाणी सगळ्यात पहिल्यांदा एका ब्लॉगवर लिहिली गेली. त्यानंतर ती प्रकाशित झाली. त्यामुळे जगभरात पोहोचली. आयओसी म्हणजे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक कमिटीनं याची दखल घेतली आणि आठवड्याभरात मरिअलच्या देशप्रेमाचा सन्मान झाला. या कमिटीचे कम्युनिकेशन मॅनेजर मार्क ॲडम्स यांनी दक्षिण सुदानच्या ॲथलिटला आयओसीच्या झेंड्याखाली या स्पर्धेत सहभागी होण्याची संमती देण्याची ब्रेकिंग न्यूज दिली.

ही बातमी जेव्हा मरिअलला पहिल्यांदा सांगण्यात आली, तेव्हा त्याचं उत्तर होतं, ब्रॅड इज हिरो, ऑफ कोर्स . खरंच होतं ते. अर्थात ब्रॅड पूरेच्या या धडपडीला, कळकळीलाच अमेरिकन ऑलिम्पिक कमिटीचे जॉन रगर यांनी साथ दिली होती.

मरिअलचं स्वप्न पूर्ण करायचं असेल, तर ही त्याची कहाणी जगासमोर पोहोचली पाहिजे, असं पहिल्यांदा वाटलं ते रगर यांना. त्यांनीच मरिअलची कथा एका पत्रकारापर्यंत पोचवली. त्याची माहिती घेताना, लोपेझ लोमोंगची माहितीही सविस्तर कळली होती. लोपेझ हा देखील दक्षिण सुदानमधून यादवी युद्धाच्या काळात अमेरिकेत आश्रयाला आला होता. अर्थात त्यावेळी दक्षिण सुदान स्वतंत्र झाला नव्हता. २००८च्या ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या लोपेझला उद्घाटन सोहळ्यात अमेरिकेचा राष्ट्रध्वज हाती घेऊन सहभागी होण्याचा मान देण्यात आला होता. याच गोष्टीची आठवण करून देत रगरनं मरिअलच्या अनपेक्षित आणि अपवादात्मक परिस्थितीची कल्पना दिली. त्यावेळी मरिअलला आपल्या देशाचं प्रतिनिधित्व करता येणार आहे याचंही भान होतं. मात्र तरीही त्याला कोणत्याही देशाचा खेळाडू न मानता धावता यावं, ही इच्छा पूर्ण होण्यासाठी ती बातमी उपयोगी पडली.



जग ज्याला अर्धी म्हणेल, पण मरिअलसाठी पूर्ण ठरेल अशी लढाई जिंकण्यासाठी हातभार लावणारे बरेच जण आहेत. पण मरिअलच खरा हिरो आहे, हे वादातीत आहे.

मरिअलचा जन्म १९८४ सालचा. त्याच्या कित्येक वर्षं आधीपासून सुदानची भूमी यादवी युद्धानं रक्तरंजित झाली होती. हे युद्ध ३९ वर्षं चालू राहिलं. त्यात त्याच्या कुटुंबातली २८ माणसं मारली गेली, तर देशभरातली कोट्यवधी. अशा परिस्थितीत पंधरा वर्षांचा मरिअल सुदानमधून पळाला. तो आणि त्याचे काका दोघंही अमेरिकेत पोहोचले, ते निर्वासित म्हणून. न्यू हॅम्प्सशायरमधल्या कॉन्कोर्डमध्ये त्यांची रवानगी झाली होती. तिथल्याच हायस्कूल-मध्ये पहिल्यांदा मरिअल ट्रॅकवर धावला. २००४ आणि २००८चं ऑलिम्पिक पाहताना त्यानं, आपणही मेहनत केली तर नक्की ऑलिम्पिकपर्यंत पोचू असं स्वप्न पाहिलं. ज्यांचं कुटुंब यादवी युद्धानं हिरावलं आहे, अशा मरिअलनं आपल्या ध्येयासक्तीला कायम धगधगतं ठेवलं.

निर्वासितांच्या छावणीत डोक्यावर छप्पर तर आलं, पण सगळं जगच मरिअलसाठी नवं होतं. ना देश आपला, ना भाषा. त्यावेळी तोडक्यामोडक्या इंग्लिशमध्ये संवाद साधायला जमणं म्हणजेदेखील आकाशाला गवसणी घालण्यासारखं होतं. लोकांशी संवाद साधता येणं तर एक आव्हानच. मरिअलचे टीममेट मात्र त्याला शिकवत होते. नव्या दोस्तांनी त्याची भाषा सुधारून घेतली. अशातच काकाची रवानगी न्यू हॅम्प्सशायरला झाली . खरं तर एकाकी मरिअलसाठी ही गोष्ट अवघड ठरायला हवी होती, पण ती मरिअलच्या पथ्यावर पडली. मित्रांमध्ये राहण्यानं त्याला घरपण मिळालं होतं.

मरिअलला धावण्यातलं मर्म जसं कळलं तसं आपल्यासारख्या कोणाला कळणार नाही . ना स्वतःचं घर, ना स्वतःचं कुटुंब अशा मरिअलला एक दिवस अचानक

स्वतःचं काहीतरी गवसल्याचा शोध लागला होता. त्याच्याच शब्दात सांगायचं तर, त्यानं धावण्याचा प्रयत्न केला, त्याला यश मिळालं. आणि मग मनात विचार आला, अरे, माझं म्हणावं असं काही सापडलंय, या यशाबरोबर धावायला काय हरकत आहे. त्याच्या या प्रयत्नांना साथ मिळाली ती गाववाल्यांबरोबर. पण त्याची चिकित्साही तो वेगळ्या प्रकारे करतो. अमेरिका म्हणजे काय तर यशस्वी माणसांचं जग. माणसांना इथे आपल्या काय हवं ते नेमकं ठाऊक आहे. यश हे त्यांचं ध्येय आहे. त्यामुळेच कॉन्कोर्डमधल्या लोकांनी माझ्यातली गुणवत्ता ओळखली, आणि ते माझ्या बाजूनं उभे राहिले. मरिअलच्या या म्हणण्यानंतर त्याच्या ट्रॅक रेकॉर्डचं रहस्य नेमकं कशात आहे, ते वेगळं सांगण्याची गरज नाही. त्यानं राष्ट्रीय पातळीवर रेकॉर्ड करत स्पर्धा जिंकल्या. आयोवा राज्याची स्कॉलरशिप मिळवली. त्या स्कॉलरशिपसाठी आवश्यक असलेला अमेरिकेतील सर्वोच्च मानमरातबही त्यानं स्वतःच्या नावे केला.

अमेरिकेत खेळतो म्हणून तिथला ॲथलिट म्हणून ऑलिम्पिकमध्ये उतरणं त्याला मान्य नव्हतं. याला कारणही तसंच आहे. एक वर्षापूर्वीच सुदानमधलं यादवी युद्ध संपुष्टात येऊन दक्षिण सुदान हा स्वतंत्र देश अस्तित्वात आला आहे. अमेरिकेत निर्वासित म्हणून राहणाऱ्या मरिअलला अमेरिकन टीममध्ये सहभागी होता येणार नाही. कारण त्याचा पत्ता अमेरिकेतला असला तरी, राष्ट्रीयत्व मात्र अमेरिकन नाही. कारण त्याच्याजवळ ना अमेरिकन पासपोर्ट आहे ना ग्रीन कार्ड. तर त्याच्या मायदेशात अजून ऑलिम्पिक समितीच अस्तित्वात आलेली नाही. अशावेळी त्याला केवळ सुदानचा नागरिक म्हणूनच लंडन ऑलिम्पिकमध्ये सहभागी होता येणार होतं. तसं आमंत्रणही सुदानकडून त्याला मिळालं होतं. हे त्याला कदापी मान्य होणारं नव्हतं. त्यासाठी तो ऑलिम्पिकवर पाणी सोडायला तयार होता.

'मी काही सुदानचा नागरिक नाही. माझं कुटुंब, माझे नातेवाईक आणि दक्षिण सुदानमधल्या दोन कोटी जनतेला मी गमावलं आहे. असं असताना सुदानचं ऑलिम्पिकमध्ये प्रतिनिधित्व करून मी माझ्या देशाशी प्रतारणा करणार नाही, ना माझ्या देशबांधवाचा अनादर करणार ज्यांनी देशासाठी प्राणाहुती दिली आहे.' ज्यानं आयुष्यात केवळ ऑलिम्पिकमध्ये धावण्याचं स्वप्न पाहिलंय, त्या मरिअलचे हे बोल चटका लावून जाणारे असतात. ज्यानं आयुष्यात कसलंही आनंद, सुख उपभोगलं नाही. ज्यानं पंधरा वर्षांचा असताना आपल्या वडिलांना शेवटचं पाहिलंय, आपल्या मातृभूमीला गेल्या तेरा वर्षांत दूरवरूनही पाहिलं नाही, अशा मरिअलनं आपलं स्वतःचं स्वप्न त्यांच्यासाठी पणाला लावलं. अर्थात मरिअलचा निर्णय वादग्रस्त ठरवला गेला. त्याला धमक्याही आल्या. पण मरिअल ठाम राहिला.

हेम्प्सशायरचे सिनेटर, पत्रकार, ऑलिम्पिक समिती सगळ्यांना मात्र मरिअलची ही देशभक्ती पाझर फोडायला लावणारी ठरली. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीनं त्याला स्वतंत्र खेळाडू म्हणून स्पर्धेत सहभागी होण्याची संधी दिली. अर्थात अशा प्रकारे स्वतंत्र खेळाडू म्हणून खेळल्याची अनेक उदाहरणं ऑलिम्पिकमध्ये आहेत. परंतु मरिअलचा लढा वेगळा आहे.

मरिअल हा या स्पर्धेत कोणत्याही देशाचा नसलेला खेळाडू म्हणून सहभागी होईल. त्यामुळेच त्याला आपला राष्ट्रध्वज बाळगता येणार नाही. त्याऐवजी तो ऑलिम्पिकचं बोधचिन्ह असलेल्या ध्वजाखाली या स्पर्धेतला खेळाडू म्हणून उतरेल. समितीचा हा निर्णय कळताच मरिअल आपल्या खोलीभर अत्यानंदानं उड्या मारत राहिला. त्यावेळी त्याला, आपल्याला वेडा समजून अमेरिकेत वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये रवानगी केल्याची तर कधी काळी इजिप्तच्या कुठल्याशा शहरात आसरा घेतला होता, याची आठवण नक्कीच झाली असणार.

व्हिसा, पासपोर्ट अशा कचकचीतून मरिअल जेव्हा प्रत्यक्ष स्टेडिअमवर उतरेल, तेव्हा मरिअलच्या डोळ्यांत वेगळीच चमक असेल. ऑलिम्पिक समितीनं परवानगी दिली तर तो आपल्या स्वतंत्र देशाच्या ध्वजातील रंग आणि आपलं नाव असलेला बँड मनगटावर बांधणार आहे. त्याला माहीत आहे की जगातल्या महान ॲथलिटशी तगडी स्पर्धा करावी लागणार आहे. त्याला स्पर्धकांची भीती कधीच वाटत नाही. कारण ते त्यांच्या स्पर्धेत असतात, तर मी माझ्याच, असं तो सांगून टाकतो.

१९९३ पासून म्हणजे सुदान सोडल्यापासून त्यानं आपल्या वडिलांना पाहिलेलं नाही, पण ऑलिम्पिकमध्ये आपण धावत असल्याचं ते नक्की पाहतील, असं तो खात्रीनं सांगतो. त्याच्या गावात वीज नाही, त्यामुळे टीव्हीही नाही. जवळच्या गावात जाऊन ते नक्की टीव्हीवर पाहतील, यात त्याला शंकाच नाही.

ऑलिम्पिकमध्ये मरिअल आपल्या देशवासींची स्वप्नं कवेत घेऊन धावत असेल तेव्हा त्याचे वडील जवळच्या म्हणजे चाळीस मैलांवरच्या गावापर्यंत पायी चालत जाऊन आपल्या मुलाला तेरा वर्षांनी पहिल्यांदा टीव्हीवर पाहतील! मी माझ्या देशाचा म्हणणारा मरिअल आपल्या हृदयात दक्षिण सुदान आणि राष्ट्रध्वज घेऊन धावेल. जर मरिअलनं सुवर्ण पदक मिळवलं तर स्टेडिअममध्ये त्याच्या राष्ट्रगीताऐवजी ऑलिम्पिकची धून वाजवली जाईल. त्यावेळी मरिअलच्या ओठांवर असलेल्या राष्ट्रगीताचे बोल मात्र दक्षिण सुदानमधल्या प्रत्येक नागरिकाच्या कानापर्यंत पोहोचतील.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# थेंबे थेंबे पाणी साचे...

## प्रशांत मोरे

**या वर्षी पावसाने हुलकावणी दिली आहे. दुष्काळाचे सावट दिसू लागल्याचे केंद्रीय कृषिमंत्र्यांनीच म्हटले आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी सरकारी यंत्रणा कामाला लागली आहे. अनावश्यक आणि अवैध पाणीउपशावर कडक उपाययोजना केली जाणार आहे. तहान लागल्यावर विहीर खणायची ही प्रथा जुनीच आहे. तरी काही व्यक्ती आपापल्या ज्ञानाच्या आधारे विविध प्रश्नांवर कार्य करत असतात. पाण्याची साठवण करण्याबाबतही असे प्रयोग होत आहेत. उल्हास परांजपे यांनी किफायतशीर खर्चात पाणी टाक्या बांधण्याचा यशस्वी प्रयोग राबवला. यासारख्या उपक्रमांचा प्रसार व्हावा, ही काळाची गरज आहे.**

अनेक गोष्टी आपल्याला कळतात, पण वळत नाहीत. पाणी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. पाणी ही आपली प्राथमिक गरज आहे. त्यावाचून आपले पानही हलू शकत नाही. पाण्यासाठी आपली सारी भिस्त मान्सूनवर अवलंबून असते. त्यामुळे मे महिन्यातच आपल्याला पावसाचे वेध लागतात. नकळत आपण आकाशात कुठे काळ्या ढगांचा पुंजका दिसतोय का हे पाहू लागतो. तो अंदमान-निकोबार बेटांवर आला, केरळमध्ये दाखल झाला की आपणही पहिल्या पावसाची आणि त्याने सारा आसमंत भारून टाकणाऱ्या मृद्गंधाची वाट पाहू लागतो. महाराष्ट्रात साधारणपणे मृग नक्षत्रात म्हणजे ७ जून रोजी पावसाचे आगमन अपेक्षित असते. मात्र तो ७ जूनला पडेलच याची कोणतीही शाश्वती देता येत नाही. गेल्या दोन वर्षी ७ जूनपूर्वीच त्याचे आगमन झाले. यंदा जून तुलनेने कोरडाच गेला आणि जुलैमध्येही मुसळधार म्हणावा असा पाऊस पडलेला नाही. आता यापुढेही तो पडेल अथवा नाही, याबाबत निश्चित काही सांगता येत नाही. पाऊस असा बिनभरवशाचा असल्याने खरीपातल्या पिकांची कुणीही हमी देऊ शकत नाही. महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुलनेने खूपच कमी पाऊस पडतो. मुंबई, ठाणे, तसेच कोकणात मुबलक पाऊस पडतो. तरीही मार्च-एप्रिल महिन्यात सर्वत्रच पाण्याचे दुर्भिक्ष्य असते.

उल्हास परांजपे यांना या विरोधाभासाचे कोडे पडले. कोकणात चार महिने मुबलक पाऊस पडतो. त्यावेळी भात, नाचणी, वरी आदी पिके घेतली जातात. इतर आठ महिने मात्र पाण्याअभावी बरीचशी जमीन नापीकच राहते. पाण्याचे सुयोग्य नियोजन होत नसल्याने ही परिस्थिती उद्‌भवल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग त्यावर उपाय शोधण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला. ते म्हणतात, 'महाराष्ट्रात साधारणपणे दरवर्षी सरासरी हजार मिलिमीटर पाऊस पडतो. अहमदनगरसारख्या ठिकाणी तो ५००/५५० मिलिमीटर असतो, तर रत्नागिरीला तीन हजार मिलिमीटर असतो. तरीही रत्नागिरी किंवा अहमदनगर येथे उन्हाळ्यात काही भागात टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. प्रत्येकाने जमेल तेवढे पावसाचे पाणी साठवले तर ही समस्या सुटू शकेल.'

उल्हास परांजपे सिव्हिल इंजिनीयर आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून त्यांनी पाणी साठवण्याच्या साध्या, सोप्या पद्धती शोधून काढल्या आणि प्रत्यक्ष मॉडेल तयार करून 'थेंबे थेंबे तळे साचे...' या म्हणीची यथार्थता सिद्ध करून दाखवली. नदी, नाले, तळी अथवा विहिरींच्या पाण्याचे नियोजन करण्याबरोबरच या सर्व प्रकारच्या जलसाठ्यांचा मुख्य स्रोत असणाऱ्या पावसाचे पाणी साठवण्याचा प्रयत्न केल्यास पाणीटंचाईची समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते, हे उल्हास परांजपे यांनी त्यांच्या 'जलवर्धिनी प्रतिष्ठान'च्या वतीने तयार करण्यात आलेल्या पाणी साठवण टाक्यांनी दाखवून दिले आहे. ठाणे जिल्ह्यातील वांगणी तसेच रायगडमधील कर्जत तालुक्यात त्यांनी साठवण टाक्या उभारल्या आहेत.

मुंबई महानगर प्रदेशात भविष्यातील वाढत्या लोकसंख्येस पुरेसा पाणीपुरवठा होण्यासाठी सध्या कोणताही नवा प्रकल्प मार्गी लागलेला नाही. त्यामुळे येत्या काही वर्षांतच महानगरवासीयांना भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उपलब्ध पाणी जपून वापरण्याबरोबरच पावसाचे जास्तीत जास्त पाणी साठवणे अपरिहार्य ठरणार आहे. त्या दृष्टीने परांजपे यांनी तयार केलेल्या टाक्या अतिशय उपयुक्त आहेत.

उल्हास परांजपे मुंबईतील सरदार वल्लभभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात



उल्हास परांजपे पाणी साठवण्याच्या टाक्यांसह



प्राध्यापकी करीत होते. १२ वर्षांपूर्वी त्यांनी पाणी साठवणीचे प्रयोग प्रत्यक्षात अमलात आणण्यास सुरुवात केली. २००३ मध्ये त्यांनी 'जलवर्धिनी प्रतिष्ठान'ची स्थापना केली. कोकण परिसरात मुबलक पाऊस पडतो. अनेकदा तर अतिवृष्टी होते. एक एकर म्हणजे चार हजार चौरस मीटर जागेत आठ हजार क्युबिक मीटर म्हणजेच सरासरी ८० लाख लिटर पाऊस पडतो. त्यापैकी पाच टक्के पाणी जरी साठवता आले तरी उन्हाळ्यात सहजपणे पाणी उपलब्ध होऊ शकेल, असा परांजपे यांचा विश्वास आहे. त्यांनी ठिकठिकाणी शेतात बांधलेल्या साठवण टाक्यांनी ते सिद्धही करून दाखवले आहे. शेतातील दहा टक्के जागेत अशा प्रकारे टाक्या बांधून पाणी साठवले तर त्याद्वारे उर्वरित ९० टक्के जागेत भाजीपाला अथवा एखादे दुबार पीक घेता येऊ शकते. गावातील गवंडीही सहजपणे बांधू शकतील अशा एकूण १४ प्रकारच्या साठवण टाक्या परांजपे यांनी तयार केल्या आहेत. नारळाचा काथ्या, अंबाडी, बनाना फायबर आदींच्या साहाय्याने या टाक्या उभारल्या जातात. त्यासाठी शेतात दोन अथवा तीन मीटर खड्डा खोदला जातो. पृष्ठभागावर हौद बांधला जातो. प्रत्येक टाकीत साधारणपणे १ ते १० हजार लिटर पाणी साठवले जाते आणि त्यासाठी दीड ते साडेतीन रुपये प्रतिलिटर खर्च येतो. या टाक्यांमधून पाणी काढण्यासाठी विजेच्या पंपाची आवश्यकता नसते.

शेतातील साठवण टाक्यांमधील हे पाणी पीक धोक्यात आल्यावर वापरता येऊ शकते. म्हणजे पाऊस कधी पडणार हे आपण ठरवू शकत नसलो तरी पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात साठवू मात्र शकतो. त्यामुळे खरीप आणि रब्बी दोन्ही पिके अधिक शाश्वत होतात, असा विश्वास परांजपे व्यक्त करतात.

रब्बी पिके हे मुख्यत: जमिनीच्या ओलसरपणावर, तसेच हिवाळ्यात पडणाऱ्या दवावर होतात. त्यांना आवश्यक असणारे पाणी साठवण टाक्यांमधून साठवता येते. शिवाय पाणी जमिनीत मुरत असल्याने भूजल पातळी वाढते. पर्यावरण आणि प्रकल्प-ग्रस्तांचे प्रश्न, तसेच वाढत्या खर्चामुळे मोठी धरणे बांधणे आता तितकेसे सोपे राहिलेले नाही. मग अशा प्रकारचे पाणी साठवण्याचे उपायच उपयोगी ठरणार आहेत. खरीप पिकादरम्यान दोन पावसांदरम्यान अंतर पडले, तर शेतातच साठवलेल्या या पाण्यामुळे पिके वाचतात, हे परांजपे यांच्या मॉडेल्सनी सिद्ध करून दाखवले आहे. तसेच, शेवटच्या पावसाचे साठणारे पाणी रब्बी पिकास उपयोगी ठरते.

महाविद्यालयीन एनएसएस युनिटच्या माध्यमातून ग्रामीण भागात पाणलोट विकासाची कामे करता येऊ शकतात, हेही जलवर्धिनी प्रतिष्ठानने रत्नागिरी जिल्ह्यात राबवलेल्या उपक्रमांद्वारे दाखवून दिले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे होतात आणि विद्यार्थ्यांवर जलसाक्षरतेचे संस्कार होतात. भविष्यकाळासाठी असे संस्कार अतिशय आवश्यक आहेत.

शेती आणि पाणी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. उल्हास परांजपे एका अभियंत्यांच्या दृष्टिकोनातून या दोन घटकांचे परस्परसंबंध स्पष्ट करत असतात. त्यांच्या या विचारमंथनातून शेतातील मातीची धूप थांबवण्यासाठी त्यांनी एक अभिनव बांध घालण्याची रचना केली आहे. त्यामुळे होतं काय, की शेतकरी मोठी तळी बांधतात आणि जादा पाणी वाहून जाण्यासाठी मोऱ्या सोडतात. या मोऱ्यांमधून पाण्याबरोबरच गाळ म्हणजे सुपीक मातीही वाहून जाते. गुजरातमध्ये फिरताना मातीची धूप न होता केवळ पाणी वाहून जाणारे बांध परांजपे यांनी पाहिले आणि त्यानुसार एक मॉडेल तयार केले. पाण्याच्या प्रवाहानुसार बांधाची उंची ठरवली जाते. त्यामुळे ज्यादा पाणी बांधावरून वाहून जाते आणि गाळ शेतातच राहतो.

जलवर्धिनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून उल्हास परांजपे कोकण, मुंबई, ठाणे परिसरात वेळोवेळी मार्गदर्शन शिबिरेही भरवतात. तसेच कुणाला व्यक्तिगत अथवा सामूहिक स्तरावर जलसंचय प्रकल्प राबवायचा असेल तर तांत्रिक साहाय्यही करतात.

संपर्क – **उल्हास परांजपे**
(९८२०७८८०६१)
**– प्रशांत मोरे**
moreprashat2000@gmail.com

# माणसं कलानगरीतील

## डॉ. माधवी मेहेंदळे

वेगळ्या दिसणाऱ्या, वेगळे कपडे घालणाऱ्या व वेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांविषयी एक कुतूहल असतं. एक सुप्त आकर्षणही असतं. ती कशी राहतात, काय विचार करतात, त्यांचा दिनक्रम कसा असेल, जीवनमूल्यं काय असतील, असे अनेक प्रश्न पडतात.

चित्रांच्या ओढीनं आम्हा दोघी मैत्रिणींनी- मी आणि मिता- एक धाडसी, म्हणजे कुठलंही बुकिंग न करता युरोपप्रवास केला. आर्ट गॅलरी ते आर्ट गॅलरी अशा आम्ही हिंडलो. चित्रं तर डोळ्यांत, मनात मावतील तेवढी साठवली. पण कुतूहलापोटी तिथली माणसंही टिपली गेली.

युरोपचा प्रवास हे माझं स्वप्न होतं. ज्या चित्रांचा अभ्यास केला, ज्या चित्रकारांविषयी वाचलं, ती चित्रं प्रत्यक्ष बघताना कसं वाटेल, त्या चित्रकारांची बोटं ज्या कॅनव्हासवर फिरली त्या कॅनव्हासकडे बघून कसं वाटेल अशा नुसत्या विचारांनीच मन आनंदित होत होतं. युरोपीय माणसांशी संवाद त्याआधी कधी झाला नव्हता. त्यामुळे 'त्या' माणसांविषयी अपार कुतूहलही होतं.

प्रवासाला सुरुवात मुंबई विमानतळापासून झाली. तिथंही माणसं दिसायला व न्याहाळायला सुरुवात झाली. तिथं कुठल्याशा यात्राकंपनीबरोबर युरोपला निघालेली उतारवयीन जोडपी होती. ब्रसेल्सचं विमान लागलं असं जाहीर केलं गेलं. तिथल्या पुरुषांचं त्याकडे लक्ष नव्हतं. 'आम्हाला सगळं कळतं', 'त्यात काय' असा आविर्भाव होता. त्यांच्या बायकांचा दबक्या आवाजात 'अहो, मी म्हणते, निदान विचारून तर बघा' असा धोशा चाललेला होता. मनात नसूनही शेवटी त्या पुरुषांनी गणवेशातल्या कुणाला तरी ही ब्रसेल्सच्या विमानासाठीची लाइन आहे का असं विचारलं. तीच लाइन आहे असं त्या गणवेशधारीनं सांगितलं अन् लगेच त्यांच्यातील कुणा एकाच्या बायकोचा टीपेचा सूर लागला- 'तरी मी सांगत होते, पण लक्ष कुठाय...!' बायकांची विजयी मुद्रा आणि पुरुषांची गोरीमोरी! मला मनातल्या मनात हसू फुटत होतं. हा टिपिकल आपल्याइथल्या नवरा-बायकोंमधला संवाद होता. युरोपातले नवराबायको असेच भांडत असतील का, असा विचार मनात डोकावला.

विमानात माझ्याशेजारी तेच जोडपं होतं. मी निग्रहानं त्यांच्याशी बोलणं टाळलं. का टाळलं, तर खरं म्हणजे नाव काय, काय करता, मुलं किती वगैरे टिपिकल संभाषणात अडकायचा माझा मुळीच मूड नव्हता. ते सगळं मागे टाकून मला नव्या दिशा बघायच्या होत्या. डॉक्टर आहे म्हटल्यावर बऱ्याचदा मंडळी अगदी कोंडीत पकडतात. लगेच त्यांच्या अमक्याच्या-तमक्याच्या डोळ्याला असं झालंय, काय कारण असेल- असा संवाद सुरू होतो. विमानाच्या सीटवरून निसटून तरी कुठे जाणार? त्यापेक्षा गप्प बसलेलं बरं. कुठलाच संवाद नको होता.

विमानात एवढ्याशा ट्रेमध्ये झाकण उघडून पदार्थ खाताना त्या एअर होस्टेसला विचारावंसं वाटत होतं, की तिनं स्वत: ही कसरत कधी करून पाहिली आहे का?

विमान वेळेवर पोचलं. विमानतळावर इमिग्रेशनच्या काउंटरवरच्या माणसानं मला नीट न्याहाळलं. मी एकटीच आलेली त्याला फार रुचलं नसावं.

"You alone?"

"Yes."

"Who is going to support you!"

"Myself."

"How?"

"I have a credit card."

अजूनही फार काही पटलं नव्हतं.

"Do you have friends here?"

"Yes."

"Do you have invitation letters from them?"

"No."

तथाकथित प्रगत व पुढारलेल्या देशातला हा संवाद होता. मी भारतातून व्हिसासाठी अर्ज केला तेव्हाही या तथाकथित प्रगत देशाकडून मला माझ्या नवऱ्याच्या "No objection Certificate"ची मागणी करण्यात आली होती. मी विचारलं होतं, ''जेव्हा माझा नवरा एकटा तुमच्या देशात येण्यासाठी व्हिसाचा अर्ज करेल तेव्हा तुम्ही माझं 'नो ऑब्जेक्शन' मागाल का?''

उत्तर होतं, ''नाही. त्याची गरज नाही.''

मी स्वतंत्र व्यावसायिक आहे. कमावती आहे. एकटी जायला सर्व दृष्टींनी समर्थ आहे. शिवाय माझ्या नवऱ्याचं ऑब्जेक्शन जरी असलं तरी मला जायचं आहे असं सांगूनही त्या देशाच्या व्हिसासाठी मला ते सर्टिफिकेट द्यावं लागलं होतं. त्या

पार्श्वभूमीवर मला आताच्या संवादाचं विशेष आश्चर्य वाटलं नाही. मात्र मला अडवायचं फार ठोस कारण न सापडल्यामुळे मला जायची परवानगी देण्यात आली.

मिताचं विमान यायला दोन तास अवकाश होता. एक्झिटमधून बाहेर पडल्यावर मी मिळेल ती पहिली खुर्ची गाठली. माझ्या दोन बॅगा व मी तिथं स्थानापन्न झालो. परक्या गोऱ्या माणसांचा गराडा होता. मी न्याहाळत बसले. मी बाहेर पडले त्याच गेटमधून येणाऱ्या सगळ्या विमानांतले लोक बाहेर पडत होते. माझ्या आजुबाजूला आप्तांची वाट बघणारी मंडळी होती. वाट बघणं, विमान आलंय की नाही ते बोर्डवर बघणं, आलेल्या लोंढ्यामध्ये 'आपलं माणूस' शोधणं, दिसलं की दोन्हीकडचे चेहरे उजळणं आणि जवळ आलं की गळाभेट, असा घटनाक्रम सुरू होता. गोरी गोरी मुलंबाळं, त्यांच्या प्रॅमस्, एका बापानं मुलाला डोक्यावरही घेतलं होतं. मी परवानगी विचारून फोटो काढत होते. कंटाळा येणं शक्यच नव्हतं. त्यांचे कपडे, केस, केसांचे रंग, पायातले बूट-चपला... सगळंच वेगळं होतं. ते बघायला मजा वाटत होती. फोटो काढायला गेले की बायका लगेच कपडे-केस सारखं करायच्या. तिथल्या साठीच्या काही मावश्या-काक्यांचेही फोटो काढले. तिथल्या तिथे थोडं हिंडले. Money exchange, Rent a car, Restaurant, Icecream, Chocolate ची दुकानं असं सगळं खचाखच होतं.

खालच्या मजल्यावर ट्रेनचं स्टेशन व त्याच्या खाली car-pickup असं होतं. मिता यायची वेळ झाली. दोघींनीच एवढे दिवस एकत्र घालवायचे होते. एकमेकींची स्पेस सांभाळायला हवी याची जाणीव मनात होतीच.

मिता आली. छान गळाभेट झाली. खाली हॉटेलच्या कार पिक-अपकडे गेलो. तिथून हॉटेल जवळच होतं. मुद्दाम तसंच घेतलं होतं, की चुकामूक झाली, विमान उशिरा आलं तर एकटीला जवळच राहता यावं.

दहा मिनिटांत हॉटेलवर पोचलो. छान टुमदार हॉटेल होतं. विश्रांती, पोटपूजा झाल्यावर संध्याकाळ मोकळी होती. जवळच्या जवळ कुठेतरी हिंडून यावं असं वाटलं तेव्हा रिसेप्शनच्या माणसाला माहिती विचारली. त्यानं काहीही सांगायला नकार दिला. मग आठवलं, आम्ही आल्याआल्याही त्याला काही गोष्टी विचारल्या होत्या. तेव्हाही त्याचा नकारच होता. म्हणजे रिसेप्शनच्या डेस्कशी उभं राहून तो आलेल्या कस्टमर्सची नावं लिहून घेणं, पैसे घेणं आणि रिसिट देणं एवढंच करत होता. मला असं वाटलं की त्याला तेवढंच येत असावं.

नंतरच्या प्रवासातही अनेक वेळा रांगेत उभं राहायची वेळ आली. दुकानात पैसे देण्याच्या, इनक्वारीच्या रांगेत जर पुढची म्हातारी बाई पर्समधून पैसे काढायला खूप वेळ घेत असेल आणि आपलं काम २ मिनिटांत होणारं असेल- आपला तिच्या मागेच नंबर असताना- तर त्या बाईचे पर्समधले पैसे सापडेपर्यंत त्या काउंटरच्या मागच्या माणसानं आपलं काम चटकन उरकून घ्यावं असं वाटतं. पण काउंटरच्या मागचा तो माणूस त्या बाईला अर्धा तास लागला तरी थांबतो आणि रांगेतल्या पुढच्या माणसालाही ताटकळत ठेवतो. आपल्या नजरेला नजरही तो तोपर्यंत देत नाही.

मला त्या सगळ्या तमाम काउंटरच्या मागच्या मंडळींना आपल्याकडचा वाणी एकदा दाखवावा असं फार मनापासून वाटलं. तो एकाच्या वस्तू पुड्यांत बांधून दोरा गुंडाळत असतो; दुसऱ्यानं मागितलेला जिन्नस काढून दाखवत असतो; तिसऱ्याचे पैसे घेऊन, हिशोब करून उरलेले पैसे परत देत असतो; कुणीतरी रस्त्यातला माणूस पत्ता विचारत आला असेल त्याला अमूक सोसायटीतला, अमूक माणूस कुठल्या गल्लीत कुठल्या मजल्यावर राहतो हे सांगत असतो; अजून कोणाला पोत्यातला नवीन आलेला गहू नमुना देत असतो... असा Multi tasking हा प्रकार त्या लोकांना माहीत नसावा. 'कमी लोकसंख्या' हा निकष तिथे बहुधा सर्वच 'वेगळेपणा'ला किंवा सर्वच प्रश्नांसाठी लागू असावा. Multi taskingची गरजही त्यामुळे कमी झाली असावी किंवा नसावीच.

बेल्जियम हिंडताना जाणवला तो तिथला चार भाषांचा प्रभाव! सगळ्या पाट्या चार भाषांत. 'फ्लेमिश' म्हणजे डचच्या जवळपासची भाषा, फ्रेंच, इंग्रजी व जर्मन. फ्रान्समध्ये फक्त फ्रेंच. आपण इंग्रजी बोललो तर चेहऱ्यावर आठ्या यायच्याच. त्यांच्या पाट्याही सगळ्या फ्रेंचमध्ये. इटलीमध्ये सगळं इटालियन भाषेत, पण निदान इंग्रजी समजून घ्यायचा प्रयत्न थोडाफार होत होता. पाट्या मात्र इटालियनमध्ये.

सगळ्या ट्रेन, मेट्रो, प्लॅटफॉर्म, स्टेशन अगदी स्वच्छ. मजेदार एक गोष्ट मात्र दिसली ती म्हणजे ग्राफिटी. जिथे जिथे शक्य आहे त्या सर्व जागी म्हणजे ट्रेनवर, रुळांच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींवर मोठमोठ्या अक्षरांत काहीतरी लिहिलेलं. त्यातही बरीच मेहनत घेतलेली दिसली. म्हणजे कुणालाही सामान्य माणसाला ते काम जमणार नाही. त्यासाठी काहीतरी प्रशिक्षणाची गरज नक्कीच असणार. बेल्जियम-रोम-फ्लॉरेन्स-ॲमस्टरडॅम सगळीकडे ग्राफिटी होतीच.

नेदरलँडमध्ये राहणारी मैत्रीण सांगत होती, की गावातली तरुण मुलं-मुली ग्राफिटी रंगवणं हा प्रकार करतात. दिवसा पकडले जातात म्हणून रात्री ही कामं करतात. त्यांची टोळीच असते म्हणे. केलेल्या कामावरून ते कोणी केलं आहे हे त्यांना लगेच समजतं. 'सही' असावी असं. हॉलंडमध्ये त्यांना शेवटी रिकाम्या भिंती उपलब्ध करून दिल्या गेल्या, की 'काय करायचंय ते यावर करा.' तरीही ग्राफिटी सुरूच आहे आणि बऱ्याच ठिकाणी ती स्वच्छ करण्यासाठी सरकारला बराच पैसा ओतावा लागतो. फ्रस्ट्रेट झालेल्या तरुणांची ती अभिव्यक्ती आहे असं समजतात. तिथली मोठी समस्याच दिसली ती. तरुणांनाही ग्राफिटीसाठी बराच पैसा खर्च करावा लागत असणार. कारण त्यांचे रंगवायचे स्प्रे गन - त्याला पैसे पडत असणार.

सुजलाम् सुफलाम्, श्रीमंत देशातले हे तरुण का बरं फ्रस्ट्रेट होत असावेत? कोण

जाणे! पण काही ठिकाणी ग्राफिटी इतकी सुंदर होती की नक्की पैसे आणि कॉन्ट्रॅक्ट देऊन कलाकारांकडून करून घेतलेली असावी.


'ब्रुह' नावाचं एक छोटंसं टुमदार गाव ब्रसेल्सशेजारी होतं. तिथे एक मोठा चौक आणि त्याच्या सर्व बाजूंनी जुन्या सुंदर इमारती, त्यावर नक्षीकाम, छोटे पुतळे, सोनेरी पुतळे. डोळ्यांत मावेना असं दृश्य होतं. चौकात कॉबल स्टोन व रस्त्यात कॉबल स्टोन आणि फूटपाथवरही कॉबल स्टोन. ठिकठिकाणी घोडागाड्या-बग्गी. रोडसाइड कॅफे. चिंचोळ्या जुन्या गल्ल्या होत्या. व्हेनिसची आठवण व्हावी असे कालवेही काही ठिकाणी होते, छोट्या बोटींची वाहतूक होती. हिंडता हिंडता त्या चौकात एका दारावर साल्वादोर दालीचं नाव दिसलं. अरेच्चा! हे काय आहे, बघुया तरी म्हणून आत डोकावलो तर तिथली काउंटरवरची बाई म्हणाली, We have 300 original works of Dali. मला एकदम 'अचानक धनलाभ' झाल्यासारखं वाटलं. दाली म्हणजे सररिॲलिझम! वितळलेली, झाडावर वाळत टाकलेली घड्याळं - म्हणजे वास्तवाच्या पलीकडचं काहीतरी. स्त्रीच्या शरीरातून मध्येच आरपार पलीकडचे दिसणारे डोंगर, कुठल्याशा जिन्यावरून चाललेली अळी, डेलियाच्या डेरेदार फुलाच्या पाकळी-पाकळीतून उगवलेली हातांची बोटं, असं काहीतरी. अंतर्मन, स्वप्न, भावना, लहानपणच्या आठवणी या सगळ्यातून जाणवणाऱ्या प्रतिमा! वास्तव जगामधील वस्तू किंवा लँडस्केप यात त्या अंतर्मनातील प्रतिमा बसवायच्या, मिसळायच्या. त्यातून काय निर्माण होईल तशी पेंटिंग्ज - pessistance of image - यात वितळलेली, पातळ झालेली, वाळत घातलेली घड्याळं - म्हणजे time-absolut नसून relative असतो असं काहीसं. माणसाच्या डोक्यामधून ओढून उघडला गेलेला ड्रॉवर - किती प्रकारच्या images आणि त्यांचे खेळ.

काही पेंटिंगमध्ये राजाच्या डोक्यावर असतो तसा मुकुट दाखवला आहे. बहुधा ते त्याचं स्वत:चं स्थान असावं. एका फ्रेममध्ये त्याचं एक मजेदार वाक्य फ्रेम करून लावलं आहे- "Someday I think I am going to die of an overdoses of satisfaction." हसायलाच आलं हे वाक्य वाचून.

चित्रविचित्र दुनियेतून बाहेर पडले आणि रियल दुनियेत आले. बेल्जियमचे प्रसिद्ध वॅफल्स खाऊन पोट भरलं. ब्रुगज्च्या छोट्याशा रेल्वेस्टेशनवर आम्ही पोचलो. आजचा दिवस कारणी लागला होता. उद्या काय हा प्रश्न होता. सगळंच धाडस. त्यामुळे आधी काही बुकिंग न करता इंटरनेट, थोडं नशीब यांच्याच भरवशावर होतो.

आदल्या दिवशी ब्रसेल्ससारख्या मोठ्या शहराच्या रेल्वेस्टेशनवर आम्ही चौकशी व बुकिंग करायचा प्रयत्न केला होता. पण मोठ्या रांगा व त्यांना 'हळुवारपणे'


## ग्रंथालीचे नवे प्रकाशन




# अरूपाचे रूप

**माणिक गुट्टे**

*विनटलेली वसुधा असे आमुची जननी*
*मानव हीच ओळख पिता तो वासरमणि*
*भ्रातृभाव अनायासे उमटवू ऐक्यनाद*

कवीच्या या डोळस स्वागतशीलतेमुळे त्याला परंपरेचे विसर्जन करण्याची गरज भासत नाही. त्याच्या परंपरेचे स्वाभाविक पर्यवसान आधुनिकतेत झालेले दिसते. मग तो कोणत्याही प्रकारच्या दैवी अधिष्ठानाशिवाय किंवा पारलौकिक संदर्भाशिवाय मानवाच्या भ्रातृभावाचे समर्थन निखळ भौतिक चौकटीतून करू शकतो...

स्वत:बद्दल, समाजाबद्दल आणि आपल्या भोवतालाबद्दल सारखीच संवेदनशीलता बाळगणाऱ्या माणिक गुट्टे यांच्या प्रस्तुत संग्रहामुळे मराठी काव्यसृष्टी अधिक समृद्ध झाली आहे.

**- डॉ. सदानंद मोरे**

**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

हाताळणारा माणूस यामुळे फार काही हाताला लागलं नव्हतं.

'छोट्या स्टेशनवर गर्दी नसेल तेव्हा तिथे बघू' हा आमचा विचार बरोबर ठरला. आम्हाला सगळी माहिती मिळाली. ब्रसेल्स ते पॅरिस या फास्ट ट्रेन – Thallys चं बुकिंग केलं. पण पॅरिसमध्ये हॉटेलचं बुकिंग काही मिळालं नाही. 'Paris is full' अशी उत्तरं मिळत होती. एवढं मोठं पॅरिस – कुठेतरी जागा मिळेलच राहायला असा आशावादी दृष्टिकोन आम्ही ठेवला.

ब्रुगजा स्टेशनवर टॉयलेटमध्ये जाण्यासाठी पैसे द्यावे लागत होते. पण तिथे पैसे घ्यायला मशीन नव्हते तर चक्क एक गोडशी, फ्रॉक घातलेली आजी होती. ती पैसे घेत होती. टॉयलेटमधून कुणी बाहेर आलं, की प्रत्येक वेळी ती आत जायची. हातात एक मोठंसं फडकं होतं. त्यानं ती आतली सीट साफ करायची. सगळं ठीक आहे याची खात्री झाली, की मगच पुढच्या व्यक्तीला आत सोडायची. मी थोडा वेळ तिथं उभं राहून तिला न्याहाळलं. ती प्रत्येक वेळा तेवढ्याच तन्मयतेनं, उत्साहानं व हसतमुखानं ते काम करत होती. खूपच आश्चर्य वाटलं. एक तर सीट हातानं पुसून घ्यायची काय गरज होती माहीत नाही. पण किती मनापासून ती तेही काम करत होती!

ब्रुगज ते ब्रसेल्स परतीचा ट्रेन प्रवास केला. कधी नव्हे ते डब्यात एक-दोन उभे लोकही होते. काहीतरी विशेष कारण असल्याशिवाय 'एवढी' गर्दी होण्याचं काही कारण नसावं. आमच्यासमोर काही महिन्यांचं बाळ घेऊन बसलेलं एक जोडपं होतं. आमच्याकडे त्यांची पाठ होती. माझ्यासमोर थोड्या पलीकडल्या सीटवर एक गोंडस गोरी आजी बसली होती. ट्रेन सुरू झाली तशी त्या समोरच्या सीटवरच्या बाळानं अगदी टिपेचा सूर धरला. ते बाळ कळवळून रडू लागलं. बापानं हिंडवलं, जोजवलं पण नाहीच! सर्व डबाभर बाळाचा रडण्याचा आवाज आदळायला लागला. डब्यातला प्रत्येक माणूस अस्वस्थ झाला. काय होतंय बाळाला? काहीतरी होतंय निश्चित. रडणं लांब लांब, मोठं मोठं होत होतं. तेवढ्यात मला समोरची आजी आपल्या जागेवरून उठताना दिसली. ती त्या जोडप्याजवळ आली. त्यांच्यात काय बोलणं झालं मला कळत नाही. पण जादूची कांडी फिरल्यागत ते बाळ एकदम रडायचं थांबलं. तिच्या चेहऱ्यावरचे ते शांत भाव, मंद स्मित बघून बऱ्याच आठवणी जागा झाल्या. कुटुंबव्यवस्थेत आजीचं स्थान किती महत्त्वाचं आहे हे पुन्हा नव्याने पटलं.

स्पर्श आठवला माझ्या आजीच्या हाताचा. मऊ, सुरकुत्या पडलेल्या हाताचा स्पर्श, घरात कोणालाही बाळ झालं की ते नुकतंच जन्मलेलं बाळ आजीच्या मांडीवर ठेवलं जाई. मग आजीचं १० ते १५ मिनिटं शांतपणे निरीक्षण चाले. शरीराची सगळी भोकं आहेत ना आणि ती आपापल्या जागांवर व्यवस्थित आहेत ना, बाळाचे हातपाय, बोटं, शी-सूच्या जागा, बेंबी, नाक-डोळे, श्वास, पोटाचा आकार – आजीनं एकदा 'ओके' केलं की आम्ही सगळे निर्धास्त. वयाचा अनुभव व प्रेम या रसायनामुळे आजी कित्येकदा डॉक्टरांच्या वरचढ वाटायची.

युरोपीय असली म्हणून काय झालं, आजी ती आजीच! मला तिच्या सुरकुतलेल्या हाताला स्पर्श करावासा वाटत होतं. माझ्या गेलेल्या आजीच्या हातासारखा असेल का?

बाळाचं रडणं थांबलं. साऱ्या डब्यानं सुस्कारा सोडला. माझंही आजुबाजूला लक्ष जायला लागलं. दोन तरुण मुली बसल्या होत्या. टीनेजर होत्या. टिपिकल कॉलेजमधल्या गप्पा चालू होत्या. त्यांच्यातल्या एकीचा चेहरा फारच छान होता. माझं राहून राहून तिच्या चेहऱ्याकडे लक्ष जात होतं. मनातल्या मनात मी तिचं पोर्ट्रेट काढायला लागले होते.

मिताच्या अमेरिकन सभ्यतेला माझं तिच्याकडे असं वारंवार बघणं आवडत नव्हतं. तिच्या डाफरण्याकडे दुर्लक्ष करून मी बघतच होते. शेवटी तिला 'Can I take your picture' असं विचारूनच टाकलं. तिच्या चेहऱ्यावर संभ्रम उमटला. मी का असं म्हणते आहे तिला कळेना. म्हणजे आपल्या सौंदर्याविषयी ती पूर्ण अनभिज्ञच असावी. कदाचित युरोपीय लोकांच्या सौंदर्याच्या कल्पना काही वेगळ्याही असतील. त्यांच्या 'सुंदर' चेहऱ्यांच्या व्याख्येत तिचा चेहरा बसतही नसावा. तिला मी इकडे बघ – आता तिकडे बघ असं म्हणत तिचे ३-४ फोटो काढले. माझ्या मैत्रिणीचाही काढ असा तिचा आग्रह होता. मैत्रिणीच्या चेहऱ्यात मला फारसा रस नव्हता. त्याबद्दल मला स्वत:चा रागही येत होता आणि रस नाही असं तिला सांगता किंवा दाखवताही येत नव्हतं. मैत्रिणीच्या चेहऱ्याचेही शेवटी एक-दोन फोटो काढले.

संध्याकाळी हॉटेलजवळ एक छोटी वस्ती होती. तिथे आम्ही पायी बरंच हिंडलो. खेड्याचं नाव Zaventum. छान टुमदार. स्वच्छ वाटेत ठिकठिकाणी रस्त्यावर फुलझाडं. एक ग्राउंड-लॉन अशी जागा होती. तरुण मुलं फूटबॉल खेळत होती. रस्ते शांत होते. छोटेसे होते. अधुनमधून एखादुसरी गाडी एवढाच काय तो ट्रॅफिक. एका रोडसाइड रेस्टॉरंटमध्ये मी खुर्चीवर जाऊन बसले. मिता इकडेतिकडे उंडारत होती. माझ्याशिवाय तिथं कुणीच नव्हतं. रेस्टॉरंटच्या आतला एक माणूस हातात एक भलामोठा झुलसारखा स्टँड घेऊन आला व माझ्याशेजारी ठेवला. मग पुन्हा आत जाऊन त्या स्टँडवर ठेवता येईल असा एक भला मोठा बोर्ड घेऊन आला. बोर्ड त्या स्टँडवर ठेवला व परत आत गेला. मला अगोदर काही कळलंच नाही. मग त्या बोर्डकडे बघितल्यावर त्यावर पदार्थ व त्यांच्या किमती लिहिलेल्या दिसल्या. तेव्हा लक्षात आलं हातात, मेन्युकार्ड ठेवण्याऐवजी तो माणूस भलामोठा बोर्डच माझ्या शेजारी ठेवून गेला होता. मला फक्त कॉफी हवी होती. तो परत आल्यावर मी त्याला सांगितलं. त्याच्याकडे जेवण होतं. कॉफी नव्हती. त्यानं लगेच नकारार्थी मान हलवली आणि बोर्ड काखोटीला मारून आत घेऊन गेला. तसाच लगबगीनं बाहेर येऊन तो भलामोठा स्टँड पण आत उचलून नेला!

प्रत्येक कस्टमरसाठी हा असंच करतो? त्याच्याकडे काही न घेता उठून येताना मला थोडं अपराधी वाटलं. त्याची ती स्टँड लावणं–काढणं ही मेहनत वाया गेली होती.

आम्ही पायी हॉटेलकडे परत निघालो. रस्ता नीट माहीत नव्हता. मिताकडे ब्लॅकबेरी हे जादूचं यंत्र व त्यावर GPS - Global Positioning System अशी अजून एक काहीतरी जादूची system होती. त्यावर आम्ही चालत होतो. ते छोटे रस्ते एवढंच नाही तर वाटेत एक लांबलचक लॉन लागलं, त्यातल्या छोट्या पायवाटा पण त्याच्यात दिसत होत्या. त्यामुळे कुणालाच काही न विचारता आम्ही त्या यंत्राच्या साहाय्यानं बरोबर ठिकाणी पोचू शकत होतो.

रस्त्यानं थोडं चालायला सुरुवात केली. समोर एक ट्रॅम थांबलेली दिसली. ट्रॅमच्या ड्रायव्हरला आम्हाला कुठे जायचंय ते सांगितलं. ट्रॅममध्ये कंडक्टर हा प्रकार नाही. दोन–चार प्रवासी मागे बसलेले. आम्हाला त्या ड्रायव्हरनं त्याच्या मागेच बसवलं. त्याला आमची काळजी वाटत असावी. बऱ्याच वर्षांनी तो इंग्रजी बोलत होता. इंग्रजी शब्दांशी त्याची धरपकड चालली होती. पैसे विचारल्यावर तो म्हणाला 'ट्रेन्टी'. मला आधी काही कळलं नाही. मग लक्षात आलं त्याला तीस म्हणायचं होतं. म्हणून तो ट्वेंटीच्या पुढचं म्हणजे 'ट्रेन्ट्री' म्हणाला. सगळ्या भाषांत काहीतरी समान सूत्र सापडतं आणि मग मजा वाटते. 'त्र' हे तीन, तेरा, तीस, त्रण आणि त्याच्या फ्लेमिश भाषेतही काहीतरी त किंवा त्र – तीनसाठी वापरत असावेत. मला फारच मजा वाटली. तशाच गप्पा तो मोडक्या–तोडक्या भाषेत मारत होता. आम्हाला मध्ये उतरायचं होतं पण तो ड्रायव्हर आम्हाला अजून पुढे चला म्हणत होता. बहुधा आम्हाला तो लांबचा फेरा पडणार असावा, पण त्याचा प्रेमळ आग्रह आम्हाला मोडताही येईना. शेवटी एका ठिकाणी त्यानं आम्हाला उतरवलं. तिथून बस पकडून हॉटेलवर आलो.

ब्रसेल्स ते पॅरिस Thallys ची फास्ट ट्रेन आम्ही सकाळी पकडली. सरासरी ३०० किलोमीटरच्या गतीनं १ तास २० मिनिटात एका देशाच्या राजधानीतून दुसऱ्या देशाच्या राजधानीत आम्ही पोचणार होतो. पुण्याला राहून मुंबईला नोकरीला जाणारा आपला नोकरदार जसा असतो तसाच इथेही दिसला. बेल्जियममध्ये राहून फ्रान्सला नोकरी करायची. संध्याकाळी परत बेल्जियम. आम्हाला अगदी आयत्या वेळी तिकिट मिळाल्यामुळे शेजारी शेजारी नंबर आला नव्हता. पण तरी आम्ही शेजारी शेजारी बसलो. बघू या कुणी आलं तर उठता येईल पण तरी मनात कुठेतरी दुसऱ्याच्या सीट नंबरवर बसलो आहोत हा ताण होताच. थोड्या वेळानं माणसं यायला लागली. कुणीही आलं, की 'आपण याच्या जागेवर बसलो आहोत का?' या विचारानं थोडं धस्स व्हायचं. मग तो माणूस पुढे गेला किंवा दुसरीकडे बसला, की 'सुटलो' व्हायचं. जसजशी माणसं येत होती तसतसं लक्षात आलं, की बरीच माणसं अशी होती जी आपली सीट सोडून भलतीकडे बसली होती. कुणी फारशी त्याबद्दल तक्रार, कुरबूर करत नव्हतं. युरोपच्या शिस्तीबद्दलच्या माझ्या कल्पनेत हे कुठे बसत नव्हतं. म्हणजेच थोडक्यात फार गर्दी नसल्यामुळे ते चालत होतं. सगळ्यांनाच बसायला जागा मिळत होती. सीटच्या समोर लॅपटॉप वगैरे ठेवायला छान सोय होती. बरेच लोक आल्याआल्या लॅपटॉप उघडून कामाला लागले.

आमच्यासमोर एक तिशी–पस्तिशीची बाई येऊन बसली. लगबगीनं आली. आल्याआल्या तिनं लॅपटॉप उघडला आणि कामात गढून गेली. मध्येच उठून कॉफी घेऊन आली. परत डोकं लॅपटॉपमध्ये खुपसलं. तिच्या कपाळाच्या आठ्यांवरून ती पूर्ण कॉन्सन्ट्रेशननं काम करत होती, असं दिसत होतं. काही वेळानं ती जरा रिलॅक्स झाली. माझी लगेच तिच्याशी बोलण्यासाठी चुळबूळ सुरू झाली. मी तिच्याशी गप्पा सुरू केल्या. ती रोज ब्रसेल्स ते पॅरिस अप–डाऊन करते. ती म्हणाली, 'मला हे असं धावपळ करणं मुळीच आवडत नाही. माझी मुलं व नवरा मी घरातून निघते तेव्हा झोपलेले असतात, घरी येते तेव्हाही झोपलेले असतात. 'I miss my home!' स्कर्ट–ब्लाउजमधली, आंतर्देशीय प्रवास करणारी, एका मोठ्या कंपनीतील मोठ्या पदाधिकारी स्त्रीच्या आडून तिच्या अंतर्मनातील गृहिणी डोकावत होती. कधी कधी अत्यंत परक्या माणसाजवळ मनातल्या व्यथा मोकळेपणी उघड होतात. कशाच्या तरी मागे धावाधाव धावणारे आपण सगळेच नक्की कशासाठी, का व कुठे धावत असतो, तेव्हा आपल्या मागे काय काय सुटते, सुटत जाते, क्षणभर थांबून विचारच करायला हवा आहे.

पॅरिस स्टेशन आलं. आम्ही दोघी उतरलो. कुठे जायचं? कुठेही बुकिंग नव्हतं. स्टेशनवरच्या एका कॅफेमध्ये वाय–फाय होतं. तिथे आम्ही गेलो. मिताची लगेच इंटरनेटवर धडपड सुरू झाली. तिचा त्या यंत्रावर प्रचंड विश्वास! जगातले कुठलेही प्रश्न त्या यंत्राद्वारे चुटकीसरशी सुटतात अशी तिची खात्री आहे. अनुभवही आहे. मला मात्र यंत्रापेक्षा माणूस बरा असं वाटतं. माणसाशी बोलता येतं. मितानं अर्धा तास यंत्राशी खटपट करून पॅरिसमधलं कुठलंच हॉटेल रिकामं नाही अशी बातमी आणली. आता काय? मी म्हटलं, बघू या! आता माणसांशी बोलून बघू. स्टेशनवर जरा हिंडलो. आमच्या पॅरिसमधल्या तीन दिवसांच्या मुक्कामातील महत्त्वाचे तास वाया चालले होते. सॉफ्ट ड्रिंक्स विकणाऱ्या स्टेशनवरच्या एका दयाळू चेहऱ्याच्या बाईला माहिती विचारली. तिनं 'त्या तिकडे' अशी खूण केली. तिच्या 'त्या तिकडे'च्या दिशेनं आम्ही बरंच चाललो. तेव्हा तिथं 'Tourist Information' चा एक बुथ दिसला. त्याच्या आत तीन माणसं होती आणि त्यांच्यापुढे प्रत्येकी एक अशा तीन वेगवेगळ्या रांगा होत्या. आम्ही रांगेत उभ्या राहिलो. रांगेचा आधीचा अनुभव काही फार सुखद नव्हता. फार संथ गतीनं रांग पुढे सरकते असाच अनुभव आतापर्यंतचा. आमचा नंबर आला. काउंटरच्या मागची बाई आमच्यासाठी 'जिनी'च ठरली. काय हवं ते

मागा, आणून हजर करते तुमच्यापुढे! 'Oh! you don't have room staying - ok.' पटापट तिच्या कॉम्प्युटरची बटणं दाबली गेली. आमच्या पुढे दोन-तीन हॉटेलांची नावं तिनं टाकली. एवढंच नव्हे तर आमच्या तीन दिवसाच्या मुक्कामाचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल हेही तिनं सांगितलं. म्युझियमचा पास आणि मेट्रो-ट्रॅम-बस असा सगळा मिळून एक पास तिनं आम्हाला दिला.

हॉटेल स्टेशनपासून अगदी जवळ आहे असं तिनं सांगितलं होतं. तिन परत 'त्या तिकडे जा' अशी खूण केली. आम्ही 'त्या तिकडे' निघालो. नशिबानं माझं व मिताचं सामान अगदी कमी होतं त्यामुळे हिंडणं बरंच सोपं झालं होतं. 'त्या तिकडे' पोचल्यावर पुन्हा तिथून दाही दिशा फुटत होत्या. आता कुठे? तिथे टुरिस्ट बसेस ये-जा करत होत्या. थांबत होत्या. एक डार्क निळ्या युनिफॉर्ममधला माणूस त्यांना मार्गदर्शन करत होता. युनिफॉर्ममधला माणूस हा आपला प्रवासातला सखाच असतो. त्यामुळे त्याला आम्ही इंग्रजीमध्ये हॉटेलचा पत्ता विचारला. त्यावर त्याचा आतापर्यंत निर्मळ असलेला चेहरा एकदम रागीट झाला. 'That's not my job' असं तुटक्या-फुटक्या इंग्रजीमध्ये दातओठ खात तो म्हणाला. एकंदर इंग्रजी बोलल्यावर फ्रान्समध्ये लोक झिडकारतात असं ऐकलं होतं. त्याचाच हा प्रत्यय होता की काय? मिता त्याच्या पाठीवर हलके टॅप करत, 'Sorry; its ok...' असं काहीतरी पुटपुटली. त्यावर 'Don't touch me' असा तो दुप्पट उसळला. इंग्रजीशी हाडवैर असलेल्या माणसाला बहुधा आम्ही इंग्रजी ऐकायलाही लावलं होतं आणि बोलायलाही लावलं होतं. नॉनव्हेज न खाणाऱ्या व त्याचा तिटकारा असणाऱ्या माणसाला नॉनव्हेजची जबरदस्तीनं चव दिल्यासारखा गुन्हा बहुधा आमच्या हातून घडला असावा.

पत्ता विचारत पायी जाण्याचा विचार आम्ही या अनुभवावरून रद्द केला. टॅक्सीमध्ये बसून थेट हॉटेलवर पोचलो. कॉम्प्युटरवर आम्हाला जी खोलीची चित्रं दाखवली होती, ती अगदी फसवी होती असं लक्षात आलं. एवढ्या लहान खोलीत कसं काय होणार असे भाव मिताच्या चेहऱ्यावर दिसत होते. खोली खरंच अगदी तोकडी होती. पण काही वेळापूर्वी आपल्याकडे काहीच सोय नव्हती. निदान डोक्यावर छप्पर तरी आहे असा विचार केला. ट्रेकमध्ये नाही का एका तंबूत दाटीदाटीनं आपण राहतो, तसंच समजायचं. टॉयलेटमध्ये एवढ्याशा जागेत वॉशबेसीन, कमोड व शॉवर ज्यानं कोणी बसवला असेल त्याचा सत्कारच करायला हवा असं वाटलं.

जपानमधलं 'कॅप्सुल हॉटेल' प्रकार आठवला. तिथे म्हणे जागेअभावी व पैशांअभावी प्रत्येक माणसाला झोपायला एक ड्रॉवर असतो. आपापला ड्रॉवर उघडायचा आणि त्यात शिरायचं. शेवटी एक शरीर आडवं ठेवायला कितीशी जागा लागते. तेवढी जागा मिळाली म्हणजे बस! न आठवायचा प्रयत्न केला तरीसुद्धा या वर्णनावरून मृतदेह ठेवले जाणारे मॉर्ग आठवतातच.

असं ऐकलंय, की मस्कतमध्ये घरांच्या किमती व भाडी एवढी वाढली आहेत की सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर कधीच पोचली आहेत. त्यावर तोडगा म्हणून दोन-तीन कुटुंब मिळून एक घर भाड्यानं घ्यायचं. पण आता सरकारनं कायदा केला आहे, की एका घरात एकच कुटुंब राहील. म्हणजे दोन-तीन कुटुंब मिळून एक घर हा तोडगाही बाद झाला. शेवटी आता लोक रस्त्यावर गाड्या ठेवून रात्री गाडीत झोपतात आणि फक्त एक तास टॉयलेट भाडं देऊन वापरतात.

न राहवून छोट्या गावातली ओस, मोठाली घरं आठवतात. पुढे-मागे अंगण, पडवी, माजघर. सगळी तरणी नोकरीधंद्याला मोठ्या शहरी. भारतातल्या शहरातलीही मोठाली घरं, फ्लॅट्स यात म्हातारे आईबाप राहतात किंवा त्यांच्यापैकी उरलेलं एकजण आणि पुढची पिढी दूरच्या देशी आपली स्वप्नं, क्षितिजं धुंडाळत कुठल्यातरी भरमसाठ किमतीच्या भाड्याच्या छोट्याशा घरी. म्हणजे जागा आहे तिथे राहायला माणसं नाहीत व माणसं आहेत तिथे जागा नाही.

पॅरिसच्या त्या आमच्या 'आलिशान' हॉटेलच्या गल्लीत सगळीकडे पाकिस्तानी लोकांची दुकानं व घरं होती. त्यामुळे 'आपल्या'सारखे बरेच चेहरे दिसले. 'आपल्या'सारखे असल्यामुळे एकीकडे बरंही वाटत होतं. पण पाकिस्तानी लोकांना भारतात तरी आपण 'आपल्या'तलं समजत नाही. भारताबाहेर भेटल्यावर त्यांची गणना 'आपल्या'त करावी की नाही याबद्दल संभ्रम पडला. याबाबतीत 'मीडिया'चा सल्ला घेता आला असता तर बरं झालं असतं. माझ्यासारख्या कित्येक नासमज लोकांची मनं आणि मतं मीडिया काय पुरवठा करते यावरच अवलंबून असतात.

नंतरच्या आमच्या पॅरिसच्या मुक्कामात तिथली महागाई चांगलीच लक्षात आली. म्हणजे 'फार महाग आहे' हे माहिती होतं पण 'फार महाग' म्हणजे आपली जी काय संकल्पना असते, त्यापेक्षाही ते सगळं कित्येक पटींनी महाग होतं.

गल्लीतून बाहेर पडल्यावर लगेच मेन रोड होता. विस्तीर्ण फुटपाथ. त्यावर छान बसायला बाकं. मी त्यावर बसून समोरचा रस्ता, दुकानं न्याहाळत बसायचे. वाहनांचे प्रकार, वेगवेगळी माणसं, त्यांच्या आपापसातल्या interactions बघताना मजा वाटायची. मिता कुठूनतरी कॉफी आणि खायला काहीतरी परवडेल असं घेऊन यायची.

पण मी तिथे बाकावर एकटी बसलेली पाहून एक भिकारीण माझ्याकडे येऊ लागली. घरी चार-पाच मुलं आहेत. त्यांना खायला नाही असं खाणाखुणांनी सांगत ती हळुहळू आक्रमक पवित्रा घ्यायला लागली. मग मात्र मी तिथून काढता पाय घेतला. नंतर नंतर रोजच ती मला तिथे दिसायची. तेवढा भाग तिची टेरिटरी असावा. नंतर पॅरिसमध्ये हिंडताना बरेच भिकारी दिसले. महागाई बघितल्यावर बऱ्याच लोकांना भीक मागावी लागतेय याबद्दल आश्चर्य वाटलं नाही.

लूव्र म्युझियम आधी बघावं असा विचार करून लूव्रकडे आम्ही निघालो. बाहेरून बघितलं – अति भव्य प्रासाद. त्या काळातल्या कोणत्यातरी राजाचा. या चौकापासून त्या चौकापर्यंत पसरलेला. त्या काळातलं बांधकाम नक्षीदार, सर्व बाजूंनी मोठमोठे पुतळे, सोनेरी कळस, ऐश्वर्याच्या खुणा ओसंडत होत्या.

प्रवाशांचे जथ्थेच्या जथ्थे, उत्साहित, कंटाळलेले, दमलेले, खाली बसलेले. हातात कॉफी-कोक-बर्गर घेऊन व्हीलचेअर-मधलेसुद्धा. जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेले. बहुधा आपलं लूव्र बघून झालं असा टिकमार्क करायला आले असतील की खरंच त्यांना पेंटिंग्ज बघण्यात रस असेल? कोण जाणे! त्या एवढ्या माणसांच्या समुद्रात बहुधा या सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश असावा.

आत गेल्या गेल्या आम्ही दोघी संगमरवरी दुनियेत हरवलो. Sculpture Garden. सर्व आकारांचे, सुडौल, संगमरवरी पुतळे. पाय हलेचना तिथून. गारुड झाल्यासारखं तिथे पाय खिळूनच राहिले. भिंतींवर रिलीफ लावलेले सर्व बाजूंनी. रिलीफ म्हणजे मागच्या बाजूनं सपाट भिंतींवर लावता येईल असे पण पुढच्या बाजूनं शिल्प कोरलेलं. त्यावर सगळीकडे युद्धप्रसंग कोरलेले – घोडे, शिपाई, शिरस्त्राण, शस्त्र, जिवंत, मेलेली, अर्धमेली माणसं.

कला आणि सामाजिक परिस्थिती यांचं किती अतूट नातं आहे. चारही बाजूंनी युद्धाच्या ज्वाळा पेटल्या असतील तर शिल्पकार तरी कसली शिल्पं करणार? शांत रस, प्रेम, निसर्ग अशी दृश्य त्यावेळेस कशी डोळ्यांसमोर येणार.

ती माणसं कशी असतील ज्यांनी ही सर्व शिल्पांची दुनिया निर्माण केली. कलाकारांनी किती कष्ट घेतले असतील! त्या आधी कुठेतरी शिक्षण घेतलं असेल. त्यांना राजाश्रय मिळाला असेल का, एका चांगल्या पुतळ्यामागे किती बिघडलेले पुतळे असतील? एका पुतळा करण्यासाठी अनेक कलाकारही असतील. पेंटिंगवर सही असते तशी पुतळ्यावर असते का? इतकी सुंदर मानवाकृती काढण्यासाठी शरीरशास्त्राचं Anatomy चंही ज्ञान मिळवावं लागत असणार.


संगमरवरी भरघोस द्राक्षाचे घड. संगमरवरी मंडपाला लगडलेले. संगमरवरी हरिणाचा वेध घेणारा धनुर्धारी युवक. हरिणाकडे बघत राहावं. मला कळत होतं, इथे मी कायमचीही राहू शकते – Forever. त्या शिल्पांच्या सर्व Curves कागदावर चिताराव्याशा वाटत होत्या. म्हणजे शिल्पकारानं आधी रेखाटन करून त्यावरून शिल्पं केली असणार आणि मी काय परत उलट करू बघत होते. शिल्पांची परत रेखाटनं करू बघत होते.

Sculpture garden चं छत पारदर्शक होतं. त्यामुळे सगळीकडे आपण बाहेर आहोत, मोकळ्या वातावरणात असंच वाटत होतं. तेच त्या जागेचं वैशिष्ट्य असावं. म्हटलं तर आत व म्हटलं तर बाहेर.

त्यापुढे मोठाली दालनं. एका दालनातून पुढे अनेक दालनंच. न संपणारी.



## ग्रंथालीची चार महत्त्वपूर्ण प्रकाशने


'अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन, कथा, कविता
यांचे बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी केलेले संकलन-संपादन




**आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे
सुधाकर गायकवाड
मूल्य ६०० रुपये
सवलतीत ३६० रुपये


**निर्णायक युद्धानंतर...**
बबन लोंढे
सुधाकर गायकवाड
मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये




**काळोखगर्भ**
बबन लोंढे
सुधाकर गायकवाड
मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

वामनदादा कर्डक
यांचे चरित्र




**एका कवीचे जीवनगाणे**
बबन लोंढे
मूल्य १६० रुपये
सवलतीत १०० रुपये

कायम आपण इथे हरवलो आहोत अशी भावना मनात. भिंतींवर सगळीकडे बहुतांशी १४व्या, १५व्या शतकातील चित्रं! मोठ-मोठ्या दालनांमुळे आपण locationwise हरवलो आहोत असं वाटत होतं आणि चित्रांचे विषय, मांडणी यामुळे 'काळ' यामध्येही आपण हरवलो आहोत असं वाटतं होतं.

आपल्याकडे कसे देवळात किंवा इतरत्र रामायण-महाभारतातल्या प्रसंगावरची चित्रं रंगवलेली असतात. तशी सगळीकडे येशू ख्रिस्ताच्या जीवनावर आधारीत व ख्रिश्चन धर्मातील गोष्टींवर आधारीत बरीच चित्रं होती. रामायण-महाभारतावरची चित्रं समजायला सोपी जातात कारण विषय-संदर्भ आपल्याला माहिती असतात. मला थोडे विषय माहिती होते. कारण एम.ए. करताना त्यातलं थोडं शिकवलं गेलं होतं. थोडं वाचनही झालं होतं. जे विषय माहिती होते त्यावरच्या चित्रांतील आशय समजत होता. अन्यथा चित्राकडे 'चित्रकृती' म्हणूनच बघायचं. माणसं, त्यांचे कपडे, स्नायू, त्यांची पोझिशन, चित्रातलं कंपोझिशन, चेहऱ्यावरचे भाव - असं बघत जायचं.

नंतर नंतर डोळे व मन काही बघेनासं झालं. यांत्रिकपणे नजर फिरायला लागली सर्व चित्रांवरून. किती घेणार यालाही काही मर्यादा असणारच. इंद्रियं थकली. Receptors अजून काही घेण्याची थांबली. या दालनातून त्या दालनात फिरत असताना मध्येच एक छोटीशी फट दिसली. उजेड आत येत होता. तिथं डोकावून बघितलं आणि एकदम मोकळं वाटलं. तजेला आला. तिथून बाहेरचा रस्ता दिसत होता. तिथं माणसं होती. हलती, बोलती, जिवंत, हसणारी. वाहता रस्ता, खरीखुरी झाडं, मोकळं आकाश. अरे, हेच तर किती छान आहे. जिवंत जीवन, मोकळं! कुठल्याच फ्रेममध्ये बंदिस्त नसणारं. अचानक जाणवलं, पेंटिंग छान असतात पण ते एक संपलेलं, थांबलेलं विश्व आहे. हे वाहतं, खळाळणारं विश्व आहे. चित्रांच्या विश्वात रमताना जिवंत विश्वाचं भान आणि त्यातली गंमत विसरायला नको.

लूव्रमधला माझा पेशन्स संपत आला. फिरून फिरून पायाचे तुकडे पडायची वेळ आली. चला, आता बाहेर पडायलाच हवं. कुंडलीत लिहिलं असेल तर परत लुव्रची भेट होईलही.

कलेत डुंबलेला भव्य प्रासाद आणि त्याची प्रेमळ का होईना पण 'कैद' सोडून बाहेरच्या जिवंत जगात पाय वळवले.

शहरातून वाहणारी 'सीन' नदी. त्यावर अनंत पूल पण सगळं नटलेलं, सजलेलं, काळ्या रंगातील शिल्प, नक्षी, मधेमधे पांढरे संगमरवर आणि अनेक ठिकाणी सोनेरी नक्षीकाम व शिल्पकाम. सोनेरी पुतळे लूव्रच्या राजवाड्यावर कमानीवरही लावलेले होते. हे एवढे चकचकीत कसे राहतात? काळे पडत नाहीत, मळकट-धुळकट दिसत नाहीत. काय वापरत असतील? माझ्या दवाखान्याच्या पाटीची अक्षरे मी काळ्या बॅकग्राउंडवर सोनेरी करून घेतली होती. ती चार-सहा महिन्यांतच काळपट झाली आणि नंतर कितीही प्रयत्न केला तरी पुन्हा चकाकती स्वच्छ झालीच नाहीत.

पूर्वी पेंटिंग्ज करण्यासाठी भिंतीचा पृष्ठभाग कसा तयार करायचा, त्यावर कसले लेप किती लावायचे जेणेकरून त्यावर काढलेली पेंटिंग्ज शंभर वर्षे तरी तशीच राहतील अशी वर्णनं मी वाचली आहेत. शंभर-दीडशे वर्षांपूर्वी बांधलेले पूल अजूनही छान आहेत आणि आजच्या वैज्ञानिक युगात, अद्ययावत तंत्रज्ञान वापरून बांधलेले पूल उद्घाटनाच्या आधी कोसळतात. याला प्रगती म्हणावं अशी अपेक्षा आहे!

रस्त्यानं जाताना इंधन न वापरता चालवता येतील अशी सर्व यंत्रं वापरात दिसली. सायकल, पायांनी ढकलून आपण लहानपणी चालवायचो तसली स्कूटर, सर्व प्रकारचे स्केट्स. सगळीकडे याचीच रेलचेल. पुढे इटली, हॉलंडमध्येही तोच प्रकार होता. हॉलंडच्या लोकांना सायकल नसली तर हातपाय नसल्यासारखे वाटते. कमिशनरपासून शाळकरी पोरांपर्यंत सर्वजण मजेत सायकलवर जातात. रस्ते व सिग्नल सायकलधार्जिणे. सायकलला तिथे प्रतिष्ठा आहे. सत्तर-पंच्याहत्तर-ऐंशी वर्षांचे आजी-आजोबा दोघं मिळून एकामागे एक अशा दोन सीट्स व दोन पायडलच्या जोड्या असलेल्या सायकली मजेत चालवत सुपर मार्केटमध्ये सामान आणायला जाताना पाहिलं. त्यांच्या सायकलला सामान ठेवण्यासाठी छान बास्केट पण होत्या.

पॅरिसच्या रस्त्यावर 'rent a bike' हा प्रकार पाहिला. सायकल स्टँडवर एकसारख्या दिसणाऱ्या सायकली लावून ठेवलेल्या. त्याची काही मेंबरशीप असावी. ज्याला पाहिजे त्यानं सायकल उचलायची. तिथल्या मीटरवर वेळ नोंदली जाते. नंतर जिकडे जायचं तिकडे पोचवल्यावर तिथेही तसाच स्टँड असणार. तिथं सायकल स्टँडला अडकवून टाकायची. जेवढा वेळ वापरली तेवढे पैसे. आपली सायकल बाळगायची गरजच नाही. किती छान प्रकार आहे. आपल्याकडेही असं काही व्हायला हवं.

रस्त्याच्या कडेला रेस्टॉरंट्स भरभरून. त्यात लोकंही भरभरून. तिथं गप्पाटप्पा, खाणंपिणं ही रुजलेली संस्कृती वाटली. अगदी लहान मुलं सोडून प्रत्येक व्यक्ती धूम्रपान करत होती. गोरी-गुलाबी, निरागस चेहऱ्याचे अल्लड तरुण लगेच दोन मिनिटांनी धूम्रपान करताना दिसायचे. या सगळ्या लोकांना आपली एवढी छान तब्येत का खराब करून घेता असं कळकळीनं विचारावंसं वाटलं. कलानगरीतील माणसं सर्व दिशांनी, सर्व स्वरूपात दिसत होती. अजून तरी माणसं 'भेटली' असं म्हणावंसं वाटलं नाही. गॅलरीत लावलेली पेंटिंग्ज बघत होतो तशीच रस्त्यात 'लावलेली' माणसं बघणं सुरू होतं. त्यांना 'भेटण्या'साठी वेगळी ट्रीप करावी लागेल की काय असं वाटायला लागलं.

**- डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com

# अष्टपैलू गायिका सुलोचना चव्हाण

## अरुण पुराणिक

चित्रपटसृष्टीतील एक काळ पाच सुलोचनांनी अक्षरश: गाजवला. सर्वात पहिली इंपीरियल मुव्हीटोनची नायिका रुबी मायर्स ऊर्फ सुलोचना, मराठी-हिंदी चित्रपटांची नायिका साहेबानू लाटकर ऊर्फ सुलोचना, नायिका सुलोचना चटर्जी, पार्श्वगायिका सुलोचना चोणकर (संगीतकार अविनाश व्यास यांची पत्नी) व आमची लाडकी गायिका, नंतरच्या काळातील लावणीसम्राज्ञी सुलोचना कदम-चव्हाण!

हे कदम कुटुंब मूळचे कोल्हापूरचे. पण सुलोचनाचे बालपण ठाकुरद्वारच्या फणसवाडी परिसरातच गेले. सुलोचनाला जवळचे लोक प्रेमाने माई म्हणून संबोधतात. व्यंकटेश्वर मंदिराच्या दारात माईच्या आईचा फुलविक्रीचा व्यवसाय होता. आजही गिरगावातील अनेक वयोवृद्ध तिला फुलवाली सुलोचना म्हणूनच ओळखतात. माई बालपणापासून नियमित असे गाणे शिकली नाही. घरच्या रेडिओ आणि ग्रामोफोनवरून जे काही कानावर पडेल ते तन्मयतेने ऐकून ती गात असे. तिचे कुणी गुरू नाहीत तसेच तिचे कुणी शिष्यही नाहीत. लहानपणापासूनच माईला हिंदी, उर्दू व गुजराती भाषा चांगल्या अवगत होत्या. ती मेळ्यातही गात असे. तिच्या नैसर्गिक आवाजाने अण्णासाहेब (सी. रामचंद्र), मुश्ताक हुसैन, ज्ञान दत्त, एस.के. पाल, पी. रमाकांत, निसार बजमी, प्रेमनाथ, पंडित शामसुंदर यांसारखे अनेक संगीतकार प्रभावित झाले. १९४६-४७ पासून ती हिंदी चित्रपटात पार्श्वगायन करू लागली.

मराठी कलाकार मराठी चित्रपट करून मग हिंदी चित्रपटात पदार्पण करतात. ही गुणी कलाकार हिंदीतून मराठी चित्रपटात आली. दिनकरराव अमेंबलनी तिला रेडिओवर गाण्याची संधी दिली. ती कॉन्ट्रॅक्टवर रेडिओसाठी गात असे. तिच्या आवाजावर लुब्ध होऊन यंग इंडिया, कोलंबिया, ट्वीन, एच.एम.व्ही. या रेकॉर्ड कंपन्यांनी तिच्या आवाजात अनेक खाजगी ध्वनिमुद्रिकाही काढल्या. बेगम अख्तरच्या गझला, सुंदराबाईंच्या बैठकीच्या लावण्याही ती त्याच ढंगाने गात असे. पन्नासच्या दशकात मंगेशकर भगिनींची सद्दी असतानाही माईची अनेक गाणी तुफान लोकप्रिय झाली होती.

'भलते बोलू नका मला सासूबाई
तुमच्या बोलण्याला मुळी बाई ताळ नाही.'

मधुकर पाठक यांनी लिहिलेली मुंबईची लावणी-

'मला मुंबईची गंमत दखवा हो
चौपाटीची हवा थंड चाखवा
बोरीबंदरचा गर्दीचा नाका
कसं चालावं जीवाला धोका
काळ्या घोड्याचा झोक लई बांका हो
पालव बंदरच्या बाकावर बसवा'

त्या काळात लोकप्रिय हिंदी सिनेमातील गाण्यांच्या चालीवर मराठी गाणी होत असत. त्यातील सर्वात लोकप्रिय गाणे होते, राजकपूरच्या 'श्री ४२०'मधील, 'इचक दाना बिचक दाना' चालीवर रचलेले, माईने लताला तोडीस तोड असे गायलेले.

'माझ्या हाती माणिक मोती घालीते उखाणा ठणठणाना
घरचा मोती आता झाला माझा हा उखाणा ठणठणाना
पाऊस नाही, पाणी नाही, रान कसे हिरवे
कात नाही, चुना नाही, तोंड कसे रंगले
ओऽऽ खातो मोती, पितो पाणी, गातो हा दिवाना...
हा उखाणा, बोला! पोपट!

माझे वडील हरिभाऊ पुराणिक नामवंत हार्मोनियमवादक असल्याने त्यांची आणि माईंची चांगली ओळख होती. त्यांनीच १९५७ साली सार्वजनिक गणेशोत्सवात मांगलवाडीतील आमच्या द्विज विहार चाळीत माईंचा गाण्यांचा कार्यक्रम ठेवला होता. त्यावेळी माई लावणीसम्राज्ञी झाली नव्हती. कार्यक्रमाला खच्चून गर्दी होती. तबल्यावर माणिकराव पोपटकर साथ करत होते. तीन तास विविध प्रकारची गाणी गाऊन माईंनी हा कार्यक्रम रंगवला होता.

शालेय वयापासूनच माईच्या आवाजाशी माझी गट्टी जमली होती. शमशाद बेगमसारखा खुला, दाणेदार आवाज! त्या आवाजात जोश होता, तारुण्याची मस्ती होती, नखरा होता, प्रणयाची धुंदी होती, जोडीला भाबडेपणाही होता. खणखणीत बंदा रुपयासारखा आवाज; कुठेही पडला तरी वाजला पाहिजे असा! त्यातील कोल्हापुरी लवंगी मिरचीचा ठसका ऐकताना मन हरखून जात असे. तिची गायकी श्रोत्यांच्या हृदयाला भिडणारी होती. पंडित शामसुंदरसारख्या प्रतिभावंत संगीतकाराला तिच्या आवाजाची भुरळ पडली यावरून माईंच्या गानकौशल्याची योग्यता लक्षात येते.

तिच्या आवाजाची योग्य दखल फक्त रेडिओ सिलोनने घेतली. तिची जवळपास पाऊणशे हिंदी गाणी आहेत हे रेडिओ सिलोनमुळेच संगीतश्रोत्यांना कळले. गेली अनेक वर्षे तिच्या वाढदिवसाला रेडिओ सिलोनवरून तिची गाणी प्रसारीत केली जातात. पूर्वी तिचा टेलिफोन नंबरही दिला जात असे. कराची, लाहोर, बलुचिस्तान, ब्रह्मदेशाहूनही श्रोते तिच्या गाण्याची फर्माईश करत असत.

तिच्या गायन कारकिर्दीला १९५५



साली एक अनपेक्षित वळण मिळाले. निर्माता-दिग्दर्शक शामराव चव्हाण यांनी कलगीतुरा या तमाशापटाची निर्मिती केली. कथा-पटकथा आणि संवाद प्रबोधनकार ठाकरे यांचे होते, तर संगीत दत्ता कोरगावकर यांचे होते. माईने पार्श्वगायन केलेला हा पहिला मराठी चित्रपट! शामराव चव्हाणांनी माईच्या गळ्यातील नजाकत अचूक ओळखून तिच्याकडून लावणी गाऊन घेतली. माईचा हा ग्रामीण ढंगातला गावरान बाज जनतेला मनापासून भावला आणि सुलोचना चव्हाण यांची लावणी गायिका म्हणून एक नवीन ओळख निर्माण झाली.

रणजीत देसाई यांच्या, तबलजीच्या जीवनावरच्या कथेवर हरिभाऊ रहातेकरांनी सहकारी तत्त्वावर 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटाची १९६२ मध्ये निर्मिती केली. कोल्हापूरचा नवीन देखणा नट अरुण सरनाईक या चित्रपटाचा नायक होता. सर्वांच्या आवडीचा मालमसाला म्हणून या चित्रपटात लावण्या, गझला व नाट्यगीते असे संगीताचे वेगवेगळे प्रकार होते. त्याकाळी 'लावणी'त वसंत पवारांचा हात कुणी धरू शकत नव्हता. 'रंगल्या रात्री अशा'च्या लावण्यांचे संगीत करताना त्यांनी दोन महत्त्वाच्या गोष्टी केल्या. गीतकार जगदीश खेबुडकर यांना प्रथम संधी देऊन त्यांच्याकडून लावण्या लिहवून घेतल्या आणि त्या लावण्यांचे चित्रीकरण राधाबाई बुधगावकर यांच्या तमाशाबारीवर केले. खेबूडकरांनी लिहिलेल्या पहिल्याच लावणीचा मुखडा होता-

'नाव गाव कशाला पुसता?
अहो, मी आहे कोल्हापूरची
मला हो म्हणतात लवंगी मिरची'

वसंतरावांनी तिला झकास चाल लावली.

कोल्हापूरच्या गीतकार व नायकाप्रमाणेच लावणी गायिकाही कोल्हापूरचीच असावी असा विचार करून वसंतरावांनी ही लावणी सुलोचना चव्हाणकडून गाऊन घ्यायची असे ठरवले. वसंतराव मग सुलोचनाबाईंना मुंबईला त्यांच्या घरी जाऊन भेटले. त्या भेटीचे वर्णन सुलोचनाबाईंच्या शब्दांत...

'त्या दिवशी मी घरात होते. अचानक दार वाजलं. दार उघडलं. बघते तर बाहेर एक गबाळ्या कपड्यांतले, केस विस्कटलेले गृहस्थ उभे!

मी म्हणाले, 'आपण कोण?'

'मी वसंत पवार. सुलोचनाबाई तुम्हीच ना? तुमच्याकडून लावणी गाऊन घ्यायची आहे.' मी थक्कच झाले. साक्षात वसंत पवार, मराठीतले एवढे मोठे नामवंत संगीतकार, माझ्या दारात उभे! त्यांनी खिशातून एक कागद काढला. घडी घातल्यामुळे पार चुरगाळलेल्या त्या कागदावरची 'लावणी' त्यांनी वाचून दाखवली. 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटासाठी जगदीश खेबूडकरांनी लिहिलेले ते पहिलेवहिले गाणे. ते गाण्याचा बहुमान मला मिळाला! दुपारच्या भोजनाची वेळ आलेली होती. मी त्यांना 'जेवणार का?' म्हणून विचारले. वसंतरावांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. ते सद्‌गदीत आवाजात म्हणाले, 'लोकांनी आजपर्यंत मला फक्त पिणार का म्हणून विचारले. प्रेमाने तुम्ही दोन घास खाणार का असे कुणीच विचारले नाही.' 'रंगल्या रात्री अशा' मोठ्या झोकात सगळीकडे झळकला. मुंबईला तो मॅजेस्टिकमध्ये लागला होता. तबलावादक अल्लारखाँ, नर्तिका मिनू मुमताज, गायक छोटा गंधर्व, पार्श्वगायिका आशा भोसले व सुलोचना चव्हाण यांनी आपल्या कलाकौशल्याने बोलपटात अक्षरश: नवरंग उधळले. पडद्यावर राधाबाई बुधकरांच्या संगीतबारीचे चित्रण बघताना प्रेक्षक अस्सल तमाशाचा अनुभव घेऊन धुंद होत. गायन-वादन, ताल-सूर, गळा-हात यांचा इतका सुरेख मिलाफ 'रंगल्या रात्री अशा'पूर्वी क्वचित झाला असेल.

कथा-पटकथा लेखक रणजीत देसाई, गीतकार जगदीश खेबूडकर, संगीतकार वसंत पवार व पार्श्वगायिका सुलोचना चव्हाण हा यशस्वी फॉर्म्युला अनंत माने यांच्या 'सवाल माझा ऐका' या चित्रपटातही होता. या चित्रपटाद्वारे माया जाधव यांनी सिनेसृष्टीत यशस्वी पदार्पण केले. 'सवाल माझा ऐका' हा चित्रपट अपेक्षेप्रमाणेच प्रेक्षकांना खूप आवडला. सर्वत्र त्याचे स्वागत झाले. सुलोचना चव्हाण यांनी गायलेल्या, 'कसं काय पाटील बरं हाय का?' व 'सोळावं वरीस धोक्याचं' या दोन लावण्यांनी तर कहर केला. संपूर्ण महाराष्ट्रात या लावण्या गाजल्या.

पुण्याच्या आर्यन टॉकीजमध्ये १० एप्रिल १९६५ रोजी 'सवाल माझा ऐका'चा रौप्यमहोत्सव आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटामाटात साजरा झाला. आचार्य अत्रे आपल्या भाषणात म्हणाले, 'जनतेने आणि सरकारने मराठी

चित्रपटास अधिक आश्रय द्यावा व मराठीचा अभिमान सर्व क्षेत्रांत जागता ठेवावा!' अत्र्यांच्या हस्ते 'सवाल माझा ऐका'च्या सर्व कलावंतांना, तंत्रज्ञांना व पडद्यामागील कामगारांनाही बोनस वाटण्यात आला. याच कार्यक्रमात आचार्य अत्रे यांनी सुलोचना चव्हाण यांना 'लावणीसम्राज्ञी' ही पदवी बहाल केली.

पुण्याच्या राम कर्वे व राम देवताळे यांच्या 'मल्हारी मार्तंड' या चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद व दिग्दर्शन दिनकर द. पाटील यांचे होते. त्यासाठी ग.दि. माडगूळकरांनी गाणी लिहिली होती. वसंतरावांनी दोन तासांत त्यातील सर्व गाण्यांना चाली लावल्या. ढोलकीची साथ बबन काळे यांनी केली होती. यातील सुलोचनाबाईंनी गायलेल्या,

'पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा
आई मला नेसव शालू नवा'
आणि
'फड सांभाळ तुऱ्याला ग आला
तुझ्या उसाला लागंल कोल्हा'

या लावण्यांचे ध्वनिमुद्रण राजकमल स्टुडिओत चालू होते. या लावण्या इतक्या सुरेख रंगल्या होत्या, की त्या ऐकायला ध्वनिमुद्रक मंगेश देसाई स्वत: जाऊन शांतारामबापूंना घेऊन आले होते. दुर्दैवाने 'मल्हारी मार्तंड'चे ध्वनिमुद्रण हे वसंतरावांच्या आयुष्यातले शेवटचे ध्वनिमुद्रण ठरले. वसंतराव गेल्याचा फार मोठा धक्का माईला बसला. त्यानंतरही माईच्या 'पाडाला पिकलाय आंबा', 'कळीदार कपुरी पान' यांसारख्या अनेक लावण्या गाजल्या.

आजच्या पिढीला सुलोचना चव्हाण यांची लावणीसम्राज्ञी एवढीच फक्त ओळख आहे. माई लावणीगायन प्रकारात सर्वश्रेष्ठ तर आहेच, परंतु तिचे कर्तृत्व फक्त एवढ्यापुरते मर्यादित नाही. मराठी चित्रपटसृष्टीत येण्याआधी तिच्या अनेक हिंदी गाण्यांनी संपूर्ण हिंदुस्थानात धुमाकूळ घातला होता. तिची गुजराती, तामीळ, पंजाबी गाणी आहेत. गझला आहेत. अनेक मातब्बर संगीतकारांची ती आवडती पार्श्वगायिका होती. मीना शोरीच्या आवाजाशी तिच्या आवाजाची गट्टी जमली होती. हुस्नलाल भगतरामच्या 'फर्माईश'मध्ये,

'मोहे आता नही है चैन, मोहे ला दे टेबल फॅन
कि मौसम गरमी का'

हे धमाल नृत्यगीत गाले आहे. 'काले बादल'मधील, 'तेरी नजरने मेरी नजरसे कह दी दिलकी बात' या गाण्यातील तिच्या कोवळ्या भाबड्या आवाजाचे अनेक दिवाने आहेत. शामसुंदरच्या 'ढोलक'मधील (१९५१) गाण्यांनी तर तिला लोकप्रियतेच्या उच्च शिखरावर बसवले. 'मगर ऐ हसीना-ए-बेखबर' या सुरील्या मुगल गीतात ती रफीला तोडीस तोड गायली आहे.

'मौसम आया है रंगीन' व 'चोरी-चोरी आगसी दिल में लगाकर चल दिए. हम तडपते रह गए, वो मुस्कुरा के चल दिए' ही हिंदी चित्रपटांच्या सुवर्णकाळातील गाजलेली गाणी आहेत. कोणत्याही पंजाबी गायिकेपेक्षा माईची गायिकी कांकणभर का होईना सरस आहे, रंजनक्षम आहे. माई हिंदी चित्रपटातच राहिली असती तर शमशाद बेगमची जागा निश्चित घेऊ शकली असती. तिच्याकडे अष्टपैलू गायनक्षमता असूनही लावणीसम्राज्ञी हा शिक्का बसल्यामुळे तिची गायकी महाराष्ट्रातच बंदिस्त झाली. तिच्या गाण्याचा आस्वाद संपूर्ण देशाला मिळायला हवा होता, असे प्रामाणिकपणे वाटते. पुरुषाच्या यशात स्त्रीची मोठी भूमिका असते. इथे उलट आहे, माईच्या यशात शामरावांची मोठी भूमिका आहे. माई, तुमचा आम्हाला अभिमान आहे.

**- अरुण पुराणिक**
arun.puranik@gmail.com

---

**यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी निमित्त योजलेल्या ग्रंथयात्रेस ठिकठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळत आहे. तेच दर्शवणारी ही बातमी**

# जुन्नरमधील ग्रंथ प्रदर्शनास तीन हजार रसिकांची भेट

## यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त उपक्रम

**जुन्नर, ता. २६ :** श्री शिव छत्रपती महाविद्यालयाने आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील ग्रंथ व छायाचित्र प्रदर्शनास रसिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. दोन दिवसांत तीन हजारांहून अधिक ग्रंथरसिकांनी प्रदर्शनास भेट दिली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. कांतिलाल पुराणे यांनी दिली.

यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व ग्रंथाली यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेल्या व त्यांच्या जीवनावर अन्य लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांसाठी स्वतंत्र दालन होते. यशवंतराव चव्हाण यांचे 'सह्याद्रीचे वारे' व 'कृष्णाकाठ' या पुस्तकांना विशेष मागणी होती. ४० प्रकाशकांची पुस्तके ठेवण्यात आली होती. ग्रंथालीने प्रकाशित केलेली पुस्तके सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली होती. बाल साहित्य, पाककृती, सौंदर्यविषयक तसेच विज्ञानविषयक पुस्तकांची आवर्जून खरेदी होत होती, असे ग्रंथालीचे शिवाजी धनके व हरिप्रसाद जयस्वाल यांनी सांगितले.

उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंतराव जगदाळे यांच्या हस्ते अनिल जोगळेकर, ग्रंथपाल लक्ष्मण थोरात यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. राज्यात १२ मार्च २०१३ पर्यंत शंभर प्रदर्शने भरविण्याचे नियोजन आहे. जुन्नर येथील हे अकरावे प्रदर्शन होते, अशी माहिती प्रतिष्ठानचे वैभव भाष्टे यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष व पुणे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. संजय काळे व प्रतिष्ठानचे दत्ता वाळसराफ यांनी मार्गदर्शन केल्याचे प्रा. पुराणे यांनी सांगितले.



जुन्नर : यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनास रसिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

# विज्ञानखेळण्यांच्या सान्निध्यात गवसली आयुष्याची दिशा

**हिनाकौसर खान**



**केवळ सातवी शिकलेला शिवाजी आयुकात सफाई कामगार म्हणून येतो आणि इथल्या विज्ञान खेळण्यांचे कसब आत्मसात करतो. तेही एवढ्या सफाईने की महाराष्ट्रातील विविध शाळा विज्ञान खेळण्यांच्या सादरीकरणासाठी त्याला आनंदाने स्वतःहून बोलावू लागतात.**

**स्वतः अनाथ असलेल्या नीतेशला इतर अनाथांची अवस्था अस्वस्थ करू लागते. त्यांना मायेचा ओलावा देण्याच्या हेतूने तो 'सावली'सारख्या संस्थेची सुरुवात करतो.**

**सर्वसामान्यांमध्ये असलेले अशाप्रकारचे कर्तृत्व आणि चांगुलपणा समाजासमोर यावा हा ध्यास घेऊन थिंक महाराष्ट्र डॉट कॉम हे वेबपोर्टल चालवले जाते. या पोर्टलवरील हे दोन लेख...**

शिवाजी माने. वय वर्षं सव्वीस. शाळेची पायरी सातवीपर्यंत चढलेला तरुण. त्याला बिकट परिस्थितीमुळे सातवीपुढे शिक्षण घेता आलं नाही. अपुऱ्या शिक्षणामुळे, त्याच्या आयुष्याची नौका काही काळ भरकटली. तो गरिबीमुळे मोलमजुरी करत असे. शिवाजी कामाच्या शोधार्थ पुण्यातल्याच आयुकापर्यंत पोचला आणि तिथंच त्याच्या आयुष्याला दिशा मिळाली. त्यानं सफाई करता करता आयुकामध्ये विज्ञानखेळणी तयार करण्याचं कसब आत्मसात केलं आणि त्याचा परिणाम असा, की आज निरनिराळ्या शाळा स्वतःहून, आनंदानं त्याला बोलावत आहेत. शिवाजी गावोगावच्या, ठिकठिकाणच्या शाळांतील मुलांना विज्ञानखेळणी तयार करायला शिकवत आहे. शिवाजीच्या घरचा चप्पलदुरुस्तीचा व्यावसाय. तेथपासून सफाई कामगार आणि आज विज्ञानखेळण्यांचा प्रशिक्षक येथपर्यंतचा त्याचा प्रवास रोमहर्षक आहे.

शिवाजीचं लहानपण लातूरच्या चाकोर तालुक्यातील जडाळा नावाच्या गावात गेलं. चर्मकार हा वडिलोपार्जित व्यवसाय. त्यांच्या घरी स्लिपर तयार करण्याचं मशीन होतं. पण घरच्या व्यवसायात नुकसान झालं, मशीन विकावं लागलं. वडील कर्जाच्या ओझ्याखाली आले. चार भाऊ, एक बहीण, आईवडील अशा मोठ्या कुटुंबाचा भार एकट्या वडिलांवर पडू लागला. शेजारच्या एकानं केरळमध्ये बुढ्ढी के बाल, सोनपापडी तयार करण्याच्या कारखान्यात मुलांना काम देतो असे सांगितलं. त्यानं एका मुलासाठी वर्षाला पाच हजार रुपये देण्याची कबुली दिली. शिवाजीनं नुकतीच सातवीची परीक्षा दिली होती. शिवाजी आणि त्याचा भाऊ प्रकाश या दोघांची केरळला रवानगी झाली. दोघा भावांचा वर्षभराचा पगार आधीच दिलेला असल्यानं त्यांना पहाटेपासून रात्रीपर्यंत राबवून घेण्यात येई. दोघे भाऊ आपण घरासाठी राबतोय या भावनेनं आनंदानं कष्ट उपसत होते. शिवाजी केरळहून परतताना आंध्रप्रदेशमध्ये कापसाच्या मिलमध्ये कापूस आणि बिया गोळा करण्याचं काम मिळवण्यासाठी हैदराबादला उतरला. कामगारांची भरती आधीच झाली होती! पुढे पुण्याला जाण्यासाठी त्याच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. त्याने आठ दिवस राबून पैसे जमवले आणि एका ट्रकवाल्याच्या मदतीनं पुण्यापर्यंतचा प्रवास केला.

त्यानं पुण्याला एका सिक्युरिटी एजन्सीत नोकरी पत्करली. मग एके ठिकाणी वेटरचं काम केलं. तिथं स्वयंपाक शिकल्यानंतर ॲल्युमिनेशन फॅक्टरीत स्वयंपाक्याचं काम केलं. त्यानंतर पुण्यातील सांगवी परिसरात एका चौकात हातगाडी लावून चप्पलविक्रीचा व्यवसाय करू लागला. त्यानंतर तो आयुकामध्ये सफाईकामगार म्हणून कामास लागला. शिवाजी आयुकामध्ये रमू लागला. 'मुक्तांगण विज्ञानशोधिके'ची विज्ञानखेळणी बनवण्याची खोली त्याला आकर्षित करत असे. त्याची चौकस वृत्ती त्याला शांत बसू देत नव्हती. तो त्या विभागाचे केंद्रप्रमुख अरविंद गुप्ता, त्यांचे सहकारी विदुला म्हैसकर, अशोक रूपनेर, ज्योती हिरेमठ यांचे खेळणी बनवण्याचं काम पाहू लागला. पडक्या, फुटक्या, कचऱ्यात टाकलेल्या वस्तूंपासून ही विज्ञाननगरी उभी राहिली याचं त्याला आश्चर्य वाटायचं! त्यानं स्वतः विज्ञानखेळणी तयार करण्यास सुरुवात केली.



**शाळा, शिबिरे आणि क्लाबमधून शिवाजी विज्ञानखेळण्यांची प्रात्य क्षिके देत असतो.**

त्याला खेळण्यांचं विश्व भुलवू लागलं. अरविंद गुप्ता यांनी त्याच्या हातातील सर्जनशीलता ओळखली. त्यांनी शिवाजीला हे काम पूर्णवेळ करणार का, ग्रामीण भागात जाऊन प्रात्यक्षिकं द्यावी लागतील. यासाठी सहा हजार रुपये देतो, पण पूर्णवेळ यावं लागेल अशी विचारणा केली. शिवाजीला सहा हजार रुपये खूपच वाटले!

शिवाजी म्हणतो, हे सहा हजार रुपये वर्षांचे असावेत असा माझा समज झाला. यावर गुप्तासरांनी हा पगार दरमहा देणार असल्याचं सांगितले आणि माझ्या डोळ्यांत पाणीच आलं! माझ्यासारख्या सातवी पास मुलाला ही संधी देऊ केल्याबद्दल गुप्तासरांना काही जणांशी अक्षरशः भांडावं लागलं. शिवाजीला विज्ञानखेळण्यांच्या सान्निध्यात काम करतानाच शिक्षणाची गोडी लागली आणि त्याचं महत्त्व कळू लागलं. तो म्हणतो, मला फार चांगले गुरू लाभले आहेत.

गणित आणि विज्ञानाचं शिक्षण नसताना विज्ञानखेळणी बनवणं आणि विज्ञानवाहिनीच्या सोबतीनं आठवड्यातून दोनदा महाराष्ट्राच्या विविध भागांतील शाळांत जाऊन विद्यार्थ्यांना विज्ञानखेळण्यांचं प्रशिक्षण देणं ही कामे शिवाजी करत आहे. त्याला विज्ञानातील अनेक नियम पक्के माहीत झाले आहेत.

शिवाजीची ज्या आयुकाच्या परिसराशी ओळख सफाईकामाच्या निमित्तानं झाली, त्याच आयुकानं शिवाजीला वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी दिली आणि त्यानं त्या संधीचे सोनं केलं! आयुकामध्ये शिवाजीला भेटायला गेलं, तर तो आनंदानं आपलं स्वागत करतो आणि आपल्याला त्याच्या खेळण्यांच्या जगात घेऊन जातो. आपल्यासमोर तुटक्या-फुटक्या वस्तूंपासून एखादं खेळणं झटकन तयार करून दाखवतानाचा त्याला होणारा आनंद शब्दातीत असतो. विज्ञानाच्या अनेक संकल्पना तो अशा सोप्या पद्धतीनं समजावतो, की जणू काही शाळेतल्या विज्ञानाच्या तासाची सफरच! मग एकदम तयार केलेली ती विज्ञानमयी वस्तू सहजासहजी मोडून तो, करून पाहणार का? असा प्रश्न करतो. शिवाजीला भेटायला कधीही जा, असा अनुभव येणार यात शंकाच नाही.

इंग्रजी भाषा येत नसली तरी तो इंग्रजी शाळेत आत्मविश्वासपूर्वक वावरतो. विज्ञानाच्या संकल्पना, परिभाषा इंग्रजीतून सांगून उर्वरित माहिती हिंदीतून देतो. पुढल्या वर्षी पुन्हा त्या शाळेत गेल्यावर सगळेच जण त्याला ओळखतात आणि मागील वर्षी काय काय शिकलो याची न विचारता उजळणी होते.

आयुकात शिवाजीला भेटायला

**पुणे विद्यापीठ परिसरातील आयुकामध्ये मंगळवार आणि गुरुवार या दिवशी विज्ञानप्रेमी आबालवृद्धांसाठी मोफत कार्यशाळा घेण्यात येते. आयुकाची ही विज्ञाननगरी शालेय मुलांनी सकाळी ९.३० ते १२.३० या वेळात फुलून गेलेली असते. यामध्ये विज्ञानखेळणी पाहण्याबरोबरच ती तयार करण्यासही शिकवले जाते.**

**एका धार्मिक सोहळ्यात उपस्थित भाविकांनाही विज्ञानखेळण्यांची प्रात्यक्षिके दाखवताना शिवाजी माने**



गेल्यावर त्याचा संवाद खेळण्यांपासूनच सुरू होतो. निरनिराळे खेळ दाखवत विविध संकल्पना तो आपल्याला सांगू लागतो. लहान मुलांना खेळणी मोडून ती कशी तयार झाली आहेत हे पाहण्याची उत्सुकता असते. बाजारातली खेळणी मोडता येतात, मात्र पुन्हा जोडता येत नाहीत. विज्ञानखेळण्यांचं तसं नसतं. विज्ञानखेळणी सायकलची ट्यूब, सीडी, तुटलेली चप्पल, पाण्याच्या बाटल्या, कागद अशा घरातील ऐंशी टक्के टाकाऊ वस्तूंचा वापर करून बनवलेली असतात. त्यामुळे मुलांच्या जिज्ञासूवृत्तीसोबत त्यांच्या कल्पकतेलाही वाव मिळतो.

शिवाजीनं विज्ञानखेळण्यांचं प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रातील बहुतेक गावे पालथी घातली आहेत. त्याचबरोबर त्यानं बंगलोर, गुजरात इथंही शिक्षकांना खेळणी तयार करण्याचं प्रशिक्षण दिले आहे. गुजरातमध्ये तर त्यानं तीन हजार मुलं आणि दोनशे शिक्षकांची कार्यशाळा घेतली होती! शिवाजीनं आतापर्यंत महाराष्ट्रातील दीडशेहून अधिक शाळांना भेट दिली असून दोनशेपेक्षा जास्त कार्यशाळाही घेतल्या आहेत. अखिल भारतीय चर्मकार संघाकडून २०११ साली 'संत रोहिदास पुरस्कार' देऊन त्याचा गौरव करण्यात आला. याच वर्षी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्याला पुरस्कार प्रदान करण्यात आला. पत्नी उमासोबत महर्षी कर्वे बचतगटाच्या मार्फत खेळणी बनवून विक्री करण्याचे काम शिवाजी करत आहे. त्याच्या लहानशा खोलीत खेळण्यांचा पसारा असतो. शिवाजी आणि त्याच्या कुटुंबाला हा पसाराच जास्त प्रिय वाटतो. खेळण्यांनी त्याचं आयुष्य घडवलं आहे.

न्यूटनला ज्या सफरचंदाच्या झाडाखाली गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचं ज्ञान झालं त्या सफरचंदाच्या झाडाचं एक बीज आयुकात लावण्यात आलं आहे. त्याच आयुकाच्या सान्निध्यात आल्यावर विज्ञानापासून अनभिज्ञ असलेल्या शिवाजीला ते ज्ञान व्हावं आणि त्याच्या आयुष्याची निश्चित दिशा ठरून जावी हा न्यूटनच्या शोधाइतकाच योगायोग नाही का?


**हिनाकौसर खान**
भ्रमणध्वनी : ९८५०३०८२००,
greenheena@gmail.com
**शिवाजी माने**
ए-५६, राजीव गांधीनगर,
पिंपळे गुरव, पुणे ४११०२७
आयुका-मुक्तांगण विज्ञानशोधिका केंद्र,
पुणे विद्यापीठ परिसर
भ्रमणध्वनी : ९९२२६८८०३९
shivajigmane@gmail.com


---

स्वयंसेवा व्यक्तिनिष्ठा

# अनाथांचा नाथ


## पद्मा कऱ्हाडे


नीतेश बनसोडे हा मूळचा राजूरचा (ता. अकोले.) त्याच्या लहानपणी त्याच्या आईचं निधन झालं. वडिलांनी आणि काकांनी त्याला वाढवलं, पण आई नाही म्हणून नीतेशकडे कायम दयेच्या भावनेतून बघितलं गेलं; हे नेमकं नीतेशला खटकत होतं. मुलाला आई नसणं किंवा आई-वडील दोघंही नसणं हा काही एखाद्याचा गुन्हा नाही. पण समाज सतत, पदोपदी या मुलांना ती आठवण करून देतो. याला आई नाही, त्याला बाप नाही अशी त्या मुलाची ओळख करून दिली जाते. त्यातून या मुलांना नकळत कमकुवत बनवलं जातं.

कोण देणार त्यांना मायेचा ओलावा? देणारे आपण स्वत: का असू नये? हा विचार नीतेशच्या मनात डोकावला आणि 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' या न्यायानं नीतेशनं २००१ साली 'सावली'चं रोपटं लावलं. त्यावेळी नीतेशचं वय होतं केवळ तेवीस वर्षं.

त्यानं स्वत:च्या घरी तीन मुलांना आणून त्यांना आधार दिला. त्यांच्या उजाड अशा आयुष्यात तो त्यांची 'सावली' बनला. आईवडिलांची माया त्यांना देऊ लागला. घरून येणाऱ्या तुटपुंज्या पैशांत स्वत:चा व तीन मुलांचा खर्च कसाबसा भागवू लागला. पैसे कमी पडत होते म्हणून एक कामचलाऊ नोकरी करू लागला. या मुलांच्या आईवडिलांपैकी एकाला एड्स झाला होता. वर्षभर नीतेशनं या मुलांना सांभाळलं. त्यानंतर त्यानं त्या मुलांना त्यांच्या नातेवाईकांकडे पोचवलं. या वर्षभराच्या काळात लोकांना समजलं, की नीतेश मुलांचा सांभाळ करतो. मग त्याच्याकडे अनेक अनाथ मुलं येऊ लागली. नीतेशही त्यांना प्रेमानं सांभाळू लागला.

'सावली'त आलेली मुलं कुपोषित, त्वचारोगानं ग्रस्त अशी होती. त्यामुळे त्यांची स्वच्छता, जखमा रोजच्या रोज साफ करणं, त्यांवर औषधं लावणं हे सर्वकाही नीतेश आईच्या मायेनं करत असे. त्याचबरोबर तो मुलांना स्वच्छतेचं महत्त्व पटवून देत असे.

पुढे 'सावली'तील मुलांची संख्या हळुहळू वाढत गेली. मुलांना आंघोळ घालणं, त्यांच्यासाठी स्वयंपाक बनवणं, त्यांना खाऊ घालणं, शाळेत पाठवणं, रात्री अंगाई गीत म्हणून त्यांना झोपवणं हे सर्व नीतेश स्वत: करतो. मुलांची शाळा घराजवळ आहे. 'सावली'तील मोठी मुलं,


जयंत नारळीकर यांनी सावलीला भेट दिली


सावलीतील मुलं बाबासाहेब पुरंदरेंसोबत

आपल्याबरोबरच्या लहान मुलांची काळजी घेतात. अगदी धाकट्या भावंडांप्रमाणे. हादेखील संस्काराचाच एक भाग.

'सावली'त एक ट्युशन टिचर येतो. तो मुलांना शाळेत काही समजलं नसेल तर त्यांच्या शंकांचं निरसन करतो. त्यामुळे त्यांच्या अभ्यासात प्रगती होते. 'सावली'मध्ये असणाऱ्या मुलांना सर्वसाधारणपणे साठ ते ऐंशी टक्क्यांच्या दरम्यान मार्क्स मिळतात. तिथं टी.व्ही. आहे, कॉम्प्युटरही आहे. त्यांचा उपयोग करमणूक व ज्ञानसंवर्धन अशा दोन्ही कारणांसाठी होतो. इनडोअर व आऊटडोअर गेम्स खेळण्याची संधीही मुलांना दिली जाते. मुलांना कराटेचं प्रशिक्षण दिलं जातं. त्याचा नियमित सरावही केला जातो. मुलांच्या शारीरिक तंदुरुस्तीकडे लक्ष दिलं जातं. मानसिक शांतता राखण्यासाठी मुलांना प्राणायाम शिकवला जातो. महिन्यातून एकदा डॉक्टरांची 'सावली'ला व्हिजिट असते.

मुलांना मनाचे श्लोक म्हणायला शिकवलं जातं. त्याशिवाय देशभक्तीपर गीतं शिकवली जातात. 'हम होंगे कामयाब' ही 'सावली'ची प्रार्थना आहे.

मुंबईचे नवीन काळे यांनी आपल्या दोन-तीन मित्रांसमवेत 'सावली'ला भेट दिली, नीतेश बनसोडे यांच्या मुलांशी गप्पा मारण्याच्या हेतूनं. त्यांनी तेथील खेळीमेळीचे आनंदी वातावरण पाहिलं. ती निरागस मुलं पाहिली आणि नवीनला असं वाटलं, की या मुलांना मुंबई म्हणजे काय? ती कशी आहे? हे दाखवावं. त्याप्रमाणे नवीन व त्याचे मित्र यांनी 'सावली'तील वीस मुलांना मुंबईला आणलं. त्यांना नेहरू तारांगण, मत्स्यालय, म्युझियम अशी काही महत्त्वाची ठिकाणं दाखवली. विमानही दाखवलं. या सर्व गोष्टी ती मुले प्रथमच पाहत होती. सर्वांत शेवटी त्यांना जुहू बीचवर नेलं. समुद्र म्हणजे काय हे मुलांना माहीतच नव्हतं! समुद्रावर गेल्यावर ती हरखूनच गेली! त्यानंतर नवीननं त्यांना 'शेव-बटाटापुरी' खायला दिली. तेव्हा 'हे काय आहे?' असं त्यांनी विचारलं. नवीननं त्यांना ही 'शेव-बटाटापुरी' आहे असं सांगितले व खा असे म्हणाला. त्यावर या मुलांनी काय बरं करावं? ती सर्वजण गोल करून वाळूवर बसली. हात जोडून सर्वांनी मिळून 'वदनी कवळ घेता' ही प्रार्थना म्हटली व त्यानंतर त्यांनी शेव-बटाटापुरी खाल्ली!

त्यानंतर थोड्या वेळानं, 'चला, आता सात वाजायला आले, आपण परत जाऊ या' असं नवीननं सांगताच, 'ही आमची प्राणायाम करायची वेळ आहे' असं मुलांनी सांगितले व सर्व मुलांनी वाळूवर बसूनच प्राणायाम केला.

'सावली'तील मुलांनी बाबासाहेब पुरंदरे यांच्याबरोबर सर्व गड, किल्ले पाहिले आहेत. बाबासाहेबांनी या मुलांना आपल्या मांडीवर बसवून किल्ल्यांची माहिती सांगितली आहे. समाजातील अनेक ज्येष्ठ व प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व 'सावली'ला भेट देऊन गेलेली आहेत. डॉ. जयंत नारळीकर, प्रवीण दवणे, संजय उपाध्ये, विश्वास नांगरे-पाटील इत्यादी. 'जेथे जातो तेथे' या लेखात, श्री. प्रवीण दवणेंनी, नीतेश बनसोडेच्या सावली प्रकल्पाचा उल्लेख केला व त्याविषयी चार-पाच ओळी लिहिल्या असतील. परंतु त्यांचे ते शब्दच नीतेशचं आयुष्य बदलण्यास कारणीभूत ठरले. संपूर्ण महाराष्ट्रातून मदतीचा ओघ नीतेशकडे आला. अंदाजे एक लाख रुपये जमा झाले. त्याशिवाय तीन लोकांनी, प्रत्येकी एका मुलांच्या संपूर्ण वर्षाच्या खर्चाचा भार उचलला.


'सावली'च्या आजुबाजूच्या परिसरातील शाळांमधील मुलांनाही फायदा व्हावा, यासाठी 'संकल्प प्रतिष्ठान' क्रीडा, पर्यावरण, सांस्कृतिक, युवाकल्याण, आरोग्यसेवा, स्वयंसेवा अशा विविध क्षेत्रांत अनेक कार्यक्रमांचं आयोजन करते.


**संकल्प प्रतिष्ठान, 'सावली',**
प्लॉ. नं. ३, लिंक रोड,
भूषणनगर (केडगाव), अहमदनगर,
भ्रमणध्वनी : ९८९०९६९३१५
savalee2008@gmail.com

**पद्मा कऱ्हाडे**
भ्रमणध्वनी : ९२२३२६२०२९
padmakarhade@rediffmail.com

ग्रंथाली

सौदी अरेबिया, आफ्रिका आणि जर्मनी या देशांमधील सामाजिक जीवनाचे विविध पैलू उलगडणारी पुस्तके. ललितशैलीतील चित्रदर्शी लेखन वाचताना रंजनासह विचारप्रवृत्त करते.




## सव्वाशे बोधकथा

दिलीप पांढरपट्टे

मूल्य १२० रुपये
सवलतीत ७५ रुपये


विशेषत: शालेय मुलांनी वाचाव्या, त्यांना भेट द्याव्या अशा उद्बोधक बोधकथा...

## सोन्याच्या धुराचे ठसके

पावशतकी सौदी अनुभव

डॉ. उज्ज्वला दळवी


मूल्य २७५ रुपये
सवलतीत १६५ रुपये




## अस्फुट आवाजांचा प्रदेश

स्वैर अनुवाद
डॉ. जयश्री गोडसे

मूल्य १८० रुपये
सवलतीत ११० रुपये





## आठवणींच्या जगात


जर्मनीतील तीन तपांचा अनुभव


निरुपमा प्रधान-सोनाळकर

मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये




शिक्षणक्षेत्रातील दोन मान्यवरांची आत्मकथने – शिक्षणातील आयुष्य आणि जीवनशिक्षण सांगणारी




## उंबरठ्यावरचे दिवस

भाऊ गावंडे

मूल्य ५०० रुपये
सवलतीत ३०० रुपये

## आठवणीतील पाउले

डॉ. बापुसाहेब रेगे

मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त आयोजित ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे



अंबरनाथ



जुन्नर



कन्नड



चाळीसगाव



सिल्लोड



धुळे

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.